# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १८ मार्च, २०१६ / फाल्गुन २८, १९३७ ( शके )**

**(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**
**(३) जलसंपदा मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १०२**

---

### पंचायत राज संस्था अधिक बळकट करण्यासाठी ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार जिल्हा परिषदांच्या अधिकारात वाढ करण्याचा प्रस्ताव

**(१) * १५१५६ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत राज संस्था अधिक बळकट करण्यासाठी ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार जिल्हा परिषदांच्या अधिकारात वाढ करुन शासन निर्णय जारी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर केव्हापर्यत अंमलबजावणी होणार आहे,

(३) तसेच पंचायत राज संस्थांच्या अधिकाराच्या शासन निर्णयावर फेरविचार करुन राज्यातील ग्रामीण शेतकरी, शेतमजूर, मागासवर्गीय जनतेच्या विकासाच्या दृष्टीने पंचायत राज संस्थांना जास्तीत जास्त सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषदांचे अधिकार वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) होय.

जिल्हा परिषदेचे कामकाज महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतूदीनुसार होत असते. पंचायत राज संस्था (जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत) ह्या स्वायत्त संस्था आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत लेखासंहिता, १९६८ व मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतूदीनुसार पंचायत राज संस्थेकडे सुपूर्द केलेल्या कार्यक्रम व योजना शासनाच्या विविध विभागाकडून कार्यान्वित करण्यासाठी अनुदाने विभागाकडून दिली जाते. त्याची अंमलबजावणी पंचायत राज संस्था त्यांच्या स्वअधिकारात करतात.

शासनाचे धोरण अधिकाराच्या विकेंद्रीकरणाचे आहे. पंचायत राज संस्था अधिक बळकट करण्यासाठी ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार राज्य शासनाकडील १४ विषय जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कढोली ग्रामपंचायत अंतर्गत (ता.सावली, जि.चंद्रपूर) येथे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२) * १५२४४ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कढोली ग्रामपंचायत अंतर्गत (ता.सावली, जि.चंद्रपूर) सन २०१२ ते २०१५ या कालावधीत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाच्या हजेरीपटावर बोगस व मृत लोकांची हजेरी लावून गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत संबंधित गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास व मा.रोजगार हमी योजना मंत्री यांना दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय व गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी कढोली गावकऱ्यांची तक्रार, मा.पालकमंत्री, चंद्रपूर यांचे पत्र व मा.लोकप्रतिनिधी यांची तक्रार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे प्राप्त झाली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने गट विकास अधिकारी पंचायत समिती, सावली यांचे मार्फत चौकशी करण्यात आली. प्राथमिक चौकशी अहवालानुसार गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. गैरव्यवहारास ग्राम रोजगार सेवक, जबाबदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. त्यामुळे ग्राम रोजगार सेवक यांना कामावरुन कमी करण्यात आले असून त्यांचेविरुद्ध पोलीस स्टेशन, सावली येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तसेच ग्राम रोजगार सेवकांचे पर्यवेक्षकीय अधिकारी ग्रामसेवक यांनी कोणतीही शहानिशा/खात्री न करता हजेरी पटावर प्रति स्वाक्षरी केली असल्याने त्यांनी कर्तव्यात कसूर केली आहे. त्यामुळे ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याच्या आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत वाढविण्याबाबत**

**(३) * १५३७४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०४२ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची आर्थिक स्थिती खालावलेली असून उत्पन्न व खर्च याचा मेळ बसविण्यासाठी राज्यातील काही विकास कामांच्या खर्चात कपात करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास कामांमध्ये कपात करण्याच्या निर्णयामुळे सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते, इमारती व अन्य बांधकामे, ग्रामविकास विभागांतर्गत ग्रामीण भागातील विकास योजना, नगरविकास विभागांतर्गत महानगरपालिका किंवा नगरपालिकांना मिळणाऱ्या निधीमध्ये कपात होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणकोणत्या विकास कामांच्या खर्चात कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे व त्यामुळे किती निधी उपलब्ध होणार आहे,
(४) असल्यास, राज्याच्या आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३), (४) व (५) योजनांतर्गत व योजनेतर निधी विभागांना वर्षाच्या सुरुवातीस उपलब्ध करून देण्यात येतो. त्यास अनुसरुन योजनांतर्गत योजनेतर निधी ७०% वितरीत करण्यात आला. वितरीत निधी व त्याचा झालेला विनियोग तसेच वर्षभर अनेक तातडीच्या किंवा अनपेक्षित मान्य करण्यात आलेल्या मागण्या तसेच शासनाने परिस्थितीनुसार वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने नियोजित खर्चाच्या बाबींच्या प्राथम्यक्रमामध्ये झालेला बदल या सर्व बाबीचा तसेच राज्याच्या उपलब्ध साधनसंपत्तीचा साकल्याने विचार करून निधी वितरणाच्या मर्यादेमध्ये योजनेतर ९०% व योजनांतर्गत ७०% वाढ करण्यात आली आहे. विकास कामांच्या अनुषंगाने योजनेतर व योजनांतर्गत भांडवली खर्च १००% मुक्त करण्यात आला आहे. या व्यक्तिरिक्त वेतन, मजूरी, निवृत्तीवेतन, विकास खर्च, दूरध्वनी, वीज, पाणी शुल्क, भाडेपट्टी व कर, शस्त्रे व दारुगोळा, पेट्रोल, तेल व वंगण, शिष्यवृत्या व विद्यावेतने, सहाय्यक अनुदाने (वेतन), व्याज, कर्जाची परतफेड यासाठीचा योजनेतर व योजनांतर्गत निधी १००% वितरीत करण्यात आला आहे.

महसूली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांच्या महसूली जमेचा आढावा वेळोवेळी घेण्यात येत आहे. तसेच अनावश्यक खर्च कमी करण्याच्या दृष्टीने नवीन पद निर्मिती व पद भरतीवर निर्बंध घालण्यात आलेले असून, उद्योगासाठी वीजेवरील अनुदान कमी केले आहे व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सुसंगत अशी कार्यवाही करून सर्व व्यक्तीगत लाभार्थी योजना आधारशी जोडून लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँकेतील खात्यात परस्पर जमा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**पाथर्डी तालुक्यात (जि.अहमदनगर) रोहयोंतर्गत कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४) * १५७०२ श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी तालुक्यात (जि.अहमदनगर) रोजगार हमी योजनेंतर्गत दिनांक १२ ऑगस्ट, २०१३ रोजी दाखल झालेल्या तक्रारीची दिनांक १० ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या तपासणी व चौकशीनुसार दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी शासनाला सादर करण्यात आलेल्या अहवालात या गैरव्यवहारात दोषी असलेल्या २० व्यक्तींविरुध्द दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास फौजदारी दाखल करण्याची शिफारस केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये अधिकारी, अभियंते, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, तत्कालिन उपजिल्हाधिकारी, तहसिलदार यांना दोषी ठरविण्यात आले असून, फौजदारीची शिफारस केलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे व उपजिल्हाधिकारी आणि तहसिलदार यांची विभागीय चौकशी करावी अशी शिफारस अपिल प्राधिकरणाने केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार रोजगार हमी योजनेतील कामांच्या गैरव्यवहाराबाबत चौकशी करून त्याचा अहवाल दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी अहमदनगर यांना सादर केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाथर्डी तालुक्यातील दुलेचांदगाव, मोहरी, माळीबाभुळगाव, माणिकदौंडी इ.गावांतील रो.ह.यो. अंतर्गत रस्ते, तलावातील गाळ काढणे इ. कामांत कोट्यवधी रुपयांची अफरातफर करणाऱ्या व अपिल प्राधिकरणाने चौकशीअंती दोषी ठरविलेल्या व्यक्तींविरुध्द प्राधिकरणाच्या शिफारशीनुसार शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी यापूर्वी चौकशीस विलंब करणाऱ्या तत्कालिन जिल्हाधिकारी तसेच अन्य अधिकाऱ्यांविरोधात हेतूत: विलंब व अक्षम्य दुर्लक्ष व कारवाईस टाळाटाळ केली म्हणून त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली व येत आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. तक्रार निवारण प्राधिकारी, अहमदनगर यांनी कामांच्या गैरव्यवहाराबाबत सखोल चौकशी करुन अहवाल दिनांक २५.२.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना सादर केला आहे.

(४) अपील प्राधिकरणाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही चालू आहे. तथापि, सदर प्रकरणी अपीलीय प्राधिकरणाच्या निर्णयाविरोधात दोषींपैकी काही अधिकारी/कर्मचारी यांनी मा.उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली आहे व अद्याप निर्णय अप्राप्त आहे. त्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) सदर प्रकरणी दोन चौकशी अधिकारी यांची नेमणूक जिल्हाधिकारी यांनी करुन चौकशी केली आहे.

(६) सदर प्रकरणी काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अपिलीय प्राधिकरणाच्या निर्णयाविरोधात मा.उच्च न्यायालयामध्ये अपिल केले आहे. न्यायालयाच्या निर्णयाचे अधिन राहून पुढील कार्यवाही करण्यात येईल. जे अधिकारी व कर्मचारी मा.उच्च न्यायालयात गेलेले नाही त्यांचेविरुद्ध प्राधिकरणाने दिलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी असे गटविकास अधिकारी पाथर्डी तसेच संबंधित खातेप्रमुखांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार त्यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(७) या प्रकरणी अपिल प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कार्यवाही चालू आहे. तथापि, दोषींपैकी अपिल प्राधिकरणाच्या निर्णयाविरोधात मा.उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाचे अधिन राहून पुढील कार्यवाही करण्यात येईल. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## राज्य शासनाच्या मालकीची व अनेक वर्षे आर्थिकदृष्टया कमकुवत असलेली सात महामंडळे बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(५) * १५५२५ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या मालकीची व अनेक वर्षे आर्थिकदृष्टया कमकुवत असलेली सात महामंडळे बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळांची मालमत्ता विक्री करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) सन २००१ पासून ते सन २००५ पर्यंत सतत तोट्यात चालत असलेली एकूण ७ महामंडळे बंद करण्याचा निर्णय राज्य शासनाने वेळोवेळी घेतला आहे. त्यानुसार सदर महामंडळांची मालमत्ता विक्री करण्यासाठी दिनांक ३०.१.२००६ च्या शासन निर्णयान्वये मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या निदेशानुसार/शिफारशीनुसार या महामंडळाची मालमत्ता विक्री/ शासनाला हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे/येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सिंदखेडा (जि.नंदुरबार) तालुक्यातील सुलवाडे-जांभफळ-कनोळी उपसा सिंचन योजना सुरु करण्याबाबत**

**(६) * १६१२१ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडा (जि.नंदुरबार) तालुक्यातील सुलवाडे-जांभफळ-कनोळी उपसा सिंचन योजना मंजूरी होऊनही सुरु झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायम दुष्काळी सिंदखेडा तालुक्यातील ३३ हजार हेक्टरवरील जमीन ओलिताखाली येणार आहे अशी योजना सुरु झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना त्वरीत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

या योजनेमुळे सिंदखेडा तालुक्यातील २६९०७ हेक्टर व धुळे तालुक्यातील ६४६० हेक्टर असे एकूण ३३३६७ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

(३) योजनेचे काम हाती घेण्यासाठी निविदा निश्चित करण्यात आली आहे. योजनेसाठी २३७ हेक्टर आवश्यक वनजमिनीच्या प्रस्तावास मान्यता मिळाली आहे. तसेच पर्यावरण प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळविण्यात आली आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात या योजनेस रु. ५.०० कोटीची तरतूद असून निधीच्या उपलब्धतेनुसार प्राथमिक कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हा रुग्णालयाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(७) * १५९२१ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा रुग्णालयांमध्ये मंजूर पदांपेक्षा अनेक पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत असून त्यांना खाजगी रुग्णालयांमध्ये जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जिल्हा रुग्णायातील मंजूर पदांपैकी वर्ग १ व वर्ग २ ची किती पदे रिक्त आहेत,
(३) असल्यास, या जिल्हा रुग्णालयाची रुग्णवाहिका, जनरेटरसाठी लागणारे इंधन आणि प्रवास खर्च यांचा सुमारे ५७ लाखांचा निधी शासनाने दिला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या निधी अभावी अनेक रुग्णसेवा बंद पडण्याच्या मार्गावर असून याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे मंजूर असलेल्या एकूण ४०७ पदांपैकी २९४ पदे भरलेली असून ११३ पदे रिक्त आहेत. तथापि, सदर रुग्णालयात कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी हे उपलब्ध साधनसामुग्री व यंत्रसामुग्रीचा वापर करुन आवश्यक आरोग्य सुविधा जनतेस उपलब्ध करून देत आहे.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा, गट-अ-१९ मंजूर पदांपैकी ४ पदे भरलेली असून १५ पदे रिक्त आहेत. तर वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गातील ३३ मंजूर पदांपैकी २३ पदे भरलेली असून ७ पदे रिक्त आहेत.

(३) व (४) रुग्णालयात उपलब्ध असलेल्या ६ रुग्णवाहिकेपैकी एका रुग्णवाहिकेची किरकोळ दुरुस्ती करण्यात येत असून, उर्वरित सर्व रुग्णवाहिका सुरु आहे. तसेच या रुग्णालयासाठी मंजूर असलेली तीनही जनरेटर सुरु आहेत. सन २००४-०५ ते सन २०१५-१६ या वर्षात इंधन, कार्यालयीन खर्च, मोटार वाहन, वाहन दुरुस्ती, देखभाल, आहार व विद्युत या बाबींसाठी ५३.३३ लाख व प्रवास भत्ता खर्चासाठी रु.३ लाखाची देयके प्रदान करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. विभागास उपलब्ध होणाऱ्या अनुदानाच्या मर्यादेत यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेसाठी निधी मिळण्याबाबत

**(८) * १४८७९ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ११८१३ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेसाठी १५० कोटी रुपयांची आवश्यकता असुन शासनाने सन २०१५-१६ या वर्षात फक्त २२ कोटी रुपयांची तरतुद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची प्रकल्पीय योजना १८७८७ हेक्टर असुन या योजनेमुळे ५५ गावांची पिण्याच्या पाण्याची टंचाई दुर होणार असल्याने सदरचा प्रस्ताव मा.राज्यपाल महोदयांना सादर करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी रुपये १५० कोटी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, अंशत: खरे आहे.

योजनेच्या पूर्णत्वासाठी रु. ४११ कोटीची गरज आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात या योजनेसाठी रु. २२.०० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर आहे.

(२) नाही.

(३) व (४) अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश यानुसार निधी उपलब्ध करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायतीकडून शेततळे करण्याची परवानगी देण्याबाबत**

**(९) * १६०१०   श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ११८३१ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**

सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी ग्रामीण राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायतीकडून १५x१५x३ मी.आकारमानाचे शेततळे करण्याची परवानगी दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्लेखित आकारमानाचे शेततळे अत्यंत लहान व उपयोगक्षम नसल्यामुळे किमान ३०x३०x३ मी. आकारमानाचे शेततळे करण्याची परवानगी ग्रामपंचायतीला देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयातील अनेक तालुके सतत दुष्काळग्रस्त असून तेथील सिंचन सुविधा वाढविणे आणि तेथील मजूरांना तत्परतेने काम उपलब्ध करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, बीड जिल्हयात ग्रामपंचायत व्यतिरिक्त इतर यंत्रणामार्फत सन २०१५-१६ मध्ये किती शेततळयांची कामे मंजुर करण्यात आली,

(५) दुष्काळी भागात अधिकाधिक शेततळींची कामे मंजुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेततळ्यांची कामे ग्रामपंचायत/यंत्रणामार्फत घेण्यास शासन निर्णय दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीमार्फत छोट्या आकारमानांच्या शेततळ्यांची कामे (१०x१०x३ मी., १५x१०x३ मी. व १५x१५x३मी.) अनुज्ञेय आहेत.

(२) होय.

(३) दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर "मागेल त्याला शेततळे" ही योजना शासनाने दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे महात्मा गांधी नरेगाअंतर्गत शेततळ्यांची कामे अनुज्ञेय आहेत. सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयांमध्ये कामांचे शेल्फ तयार ठेवण्यात आले असून, कामाची मागणी होताच काम उपलब्ध करुन देण्याची तजवीज करण्यात आली आहे.

(४) बीड जिल्ह्यात कृषि विभागामार्फत सन २०१५-२०१६ मध्ये ९६२ शेततळ्यांची कामे मंजूर करण्यात आली असून, त्यापैकी ५० शेततळी पूर्ण झालेली आहेत.

(५) महात्मा गांधी नरेगाअंतर्गत ग्रामपंचायत/यंत्रणामार्फत शेततळ्यांची कामे अनुज्ञेय आहेत. तसेच दुष्काळी भागात अधिकाधिक शेततळी घेण्याकरिता "मागेल त्याला शेततळे" ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महंमदवाडी, पुणे येथे निरिक्षणगृहात ठेवण्यात आलेल्या महिला बेपत्ता झाल्याबाबत

**(१०) * १५८०० अॅड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या दलालाच्या तावडीतून पुणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सोडवून महंमदवाडी येथील निरिक्षणगृहात ठेवण्यात आलेल्या १०१ महिलांमधील १९ तरुण महिला बेपत्ता झाल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर निरिक्षणगृहांतील अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

रेस्क्यु फौऊडेशन संचलित संरक्षणगृह, महंमदवाडी, हडपसर पुणे या संस्थेत दिनांक ०८/१२/२०१५ रोजी संस्थेच्या पटावर एकुण ५७ महिला प्रवेशिता दाखल होत्या. दिनांक ०८.१२.२०१५ रोजी संस्थेतील एकूण ३८ प्रवेशिता रात्री ८.०० ते ८.४५ च्या दरम्यान दरवाजे तोडून संस्थेतील सर्व साहित्याची लोखंडी गजाने तोडफोड केली. यामध्ये संस्थेचे फर्निचर, संगणक, प्रिंटर, झेरॉक्स मशिन, टेबलावरील काचा, कपाटाच्या काचा, खिडक्यांच्या काचा इत्यादी साहित्याची तोडफोड केली आणि त्या सर्व दरवाजे तोडून रस्त्यावर आल्या व तेथून पळून गेल्या. त्यावेळेस पोलीस त्यांचा पाठलाग करीत असता पोलिसांवर प्रवेशितांनी दगडफेक केली. तसेच या अनुषंगाने अधिक्षीका यांनी दिनांक ०८.१२.२०१५ रोजी ८.४५ वाजता पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली आहे.

(२) दिनांक ०८/१२/२०१५ रोजी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे व मा.विभागीय उप आयुक्त पुणे यांनी तात्काळ सदर संस्थेस भेट दिली. दिनांक ०९/१२/२०१५ रोजी संस्थेत पुनश्च: जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व जिल्हा परिविक्षा अधिकारी व परिविक्षा अधिकारी यांनी भेट देऊन चौकशी केलेली आहे. त्याच प्रमाणे विभागीय उपआयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दोन वर्ग-१ महिला अधिकारी यांची समिती गठीत करुन चौकशी करण्यात आली.

(३) सदर प्रकरणी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने महिला अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमुन चौकशी करण्यात आली सदर चौकशी मध्ये बांग्लादेशी प्रवेशित महिलांनी एकत्रित येऊन संगनमताने नियोजन करुन संस्थेत विघातक कृत्य करुन, जाळपोळ करुन, दहशत माजविणे, बंकर बेडचे रॉड काढून मोठ्या प्रमाणात संस्थेतील साहित्याचे मोडतोड, नासधूस केलेली आहे. तसेच बंदिस्त लोखंडी दरवाजे तोडून पळुन गेल्या. त्यावेळेस पोलीस त्यांचा पाठलाग करीत असता पोलिसांवर प्रवेशितांनी दगडफेक तसेच त्यांना काठी/लोखंडी रॉड उगारुन एकजुटीने मोठ्या संख्येने दहशत माजवुन पळुन गेल्या.

तसेच प्रवेशितांना जेवण व नाष्टा पोठभर मिळत असल्याचे आणि नाष्टा व जेवणात विविधता व आठवड्यातुन एक वेळ अंडी, मटण व चिकन देत असल्याचे दिसुन आले. स्थानिक महिलांचे त्यांच्या कुटुबांत लवकर पुन:स्थापन होते व परदेशी महिलांना त्यांच्या मायदेशी रवानगी करण्यास परवानगी मिळण्यास विलंब होत असल्याने अशी घटना प्रवेशितांनी घडवुन आणली असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे.

सदरची घटना प्रवेशितांनी अचानक घडवुन आणुन संस्थेतील साहित्याची तोडफोड करुन व दहशत माजवुन संस्थेतुन पळुन गेल्याने संस्थेतील कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात आलेले नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने संस्थेतील कोणाही कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात महानगरपालिका व जिल्हा परिषदांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्रीस घातलेली बंदी**

**(११) * १५७०९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महानगरपालिका व जिल्हा परिषदांच्या परिसरात १०० यार्ड इतक्या परिघामध्ये तंबाखू व तंबाखुजन्य उत्पादनाची विक्री करण्यास शासनाने कायद्याद्वारे बंदी घातली असतानाही त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा परिसरात तंबाखु बंदी असलेला बोर्ड लावण्याबाबतची सक्ती शासनाने सर्व शाळांवर बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळा परिसरात असलेल्या पानपट्टीची तसेच किराणा मालाच्या दुकानामध्ये तंबाखुजन्य पदार्थांची विक्री न करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही. तथापि शाळेच्या १०० यार्ड परिसरात अशी बंदी आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शैक्षणिक संस्थापासून १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्रीस बंदी आहे व तसेच शाळेच्या प्रवेशद्वारावर फलक लावणे बंधनकारक केले आहे. सदर नियमाचे पालन न करणाऱ्या व्यक्तीस रु. २००/- (दोनशे रुपये) दंडासह शिक्षापात्र गुन्हा आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड तालुक्यातील बिंदुसरा नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याबाबत**

**(१२) * १६१७० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड तालुक्यातील बिंदुसरा नदी ही शेतकऱ्यांची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाते या नदीचे पुनर्जीवन होण्याकरिता खोलीकरण व रुंदीकरण होणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदीचा कृती आराखडा तयार केला आहे काय,

(३) असल्यास, नदीच्या खोलीकरण व रुंदीकरणाकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) बीड तालुक्यातील बिंदुसरा नदीचा बराचसा भाग बीड शहरातून जातो. नदीच्या काही भागामध्ये खोलीकरण व रुंदीकरणाचे काम सन २०१५-१६ मध्ये लोकसहभागातून, सेवाभावी संस्थेमार्फत केलेले आहे.

बिंदुसरा नदीचे पाणलोट क्षेत्र जास्तीचे असल्याने तसेच नदीपात्राची रुंदी सुध्दा जास्तीची असल्याने सदर नदीवर सिमेंट बंधारे तांत्रिकदृष्ट्या घेता येणे शक्य नाही, म्हणून बिंदुसरा नदीला मिळणाऱ्या नद्या नाल्यावर तांत्रिकदृष्ट्या योग्य त्या जागी सिमेंट बंधाऱ्याची जलयुक्त शिवार टप्पा-१ व गॅप फंडिंग अंतर्गत कामे करण्यात आलेली असून काही कामे प्रगती पथावर आहेत.

-----------------

## राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थश्रेणीची २५ टक्के पदे रद्द करण्याचे आदेश काढल्याबाबत

**(१३) * १६१९९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थश्रेणीची २५ टक्के म्हणजे ४० ते ४५ हजार पदे रद्द करण्याचे आदेश माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान वित्त विभागाने निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही पदे रद्द केल्याने उर्वरित कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडणार असून शासकीय कामात दिरंगाई, अडथळे येण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही पदे रद्द न करता या पदांवर त्वरित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना अधिकची संधी देण्याची गरज, शासनाच्या कार्यपद्धतीतील माहिती तंत्रज्ञान व ई-ऑफिस प्रणालीचा वाढता वापर, काळानुरुप शासनाच्या मनुष्यबळात बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबींचा विचार करुन शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १४ जानेवारी, २०१६ नुसार लिपिक संवर्गात गट-ड कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भरावयाच्या पदांची मर्यादा संवर्गसंख्येच्या २५ टक्के वरुन ५० टक्के पर्यंत वाढविण्यात आली आहे. गट-ड संवर्गातील मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे निरसित करण्यासाठी प्रशासकीय विभागांना सहा महिने मुदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या कारभारासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याबाबत**

**(१४) * १४९३२ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ५०१० ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ईएसआयएस रुग्णालयाचे केंद्रीय विमा योजनेने ७५० कोटी रुपये थकविल्यामुळे कामगार रुग्णालयांचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांची जबाबदारी केंद्र शासन स्वीकारण्यास तयार नसल्यामुळे या रुग्णालयासाठी शासन स्वतंत्र महामंडळ स्थापन करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामंडळाची स्थापना करण्याबाबत तसेच राज्यातील हजारो कामगारांना आरोग्य विषयक सुविधा मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राकावि योजनेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवेवर प्रथम राज्य शासनामार्फत संपूर्ण खर्च करण्यात येतो व नंतर केंद्र शासनाकडून झालेल्या खर्चाची परामर्यादेत राहून (ceiling) १:७ या प्रमाणात प्रतिपुर्ती करण्यात येते. राकावि योजनेच्या हस्तांतरणाची कार्यवाही प्रलंबित राहून नविन धोरणात्मक निर्णय न झाल्याने राकावि योजनेवर होणाऱ्या एकूण खर्चामध्ये घट झाली व त्यामुळे मागील ८ वर्षामध्ये परामर्यादेनुसार राकावि महामंडळाकडून अनुज्ञेय असलेले सुमारे ८९० कोटी उपलब्ध होऊ शकले नाही व त्यामुळे खर्च करता आले नाही. राकावि महामंडळ फक्त खर्च केलेल्या रक्कमेची ८७.५ टक्के प्रतिपुर्ती करते.

(२) हे ही अंशत: खरे आहे.

मा.केंद्र राज्यमंत्री (श्रम व रोजगार) यांनी डिसेंबर, २०१४ मध्ये दिलेल्या मुंबई भेटीच्या वेळेस पत्रकार परिषदेत राकावि योजना राज्य शासनाने चालवावी असे जाहीर केले आहे. तथापि, यासंदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप लेखी सूचना प्राप्त झालेली नाही.

सर्व राज्यांना राज्यस्तरीय महामंडळ निर्मित करून त्यामार्फत वैद्यकीय सेवा पुरवून राकावि योजना अधिक प्रभावी व कार्यक्षमतेने राबविता यावी याकरिता केंद्र शासनाने सन २०१० मध्ये मुळ "राज्य कामगार अधिनियम (सुधारीत) २०१०" अन्वये तशी तरतूद केली आहे.

तथापि ऑगस्ट, २०१० मध्ये राज्य मंत्रीमंडळाने संपूर्ण राकावि योजना केंद्र शासनास हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतल्यामुळे त्यावेळेस राज्यस्तरीय महामंडळ निर्मित करण्याबाबतची कार्यवाही होऊ शकली नाही. राज्यस्तरीय राकावि महामंडळ निर्माण करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) राकावि महामंडळ, श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी राकावि योजनेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवेमध्ये सर्वसमावेशक सुधारणा करण्यासाठी जुलै, २०१४ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार "राज्य कार्यकारी समिती" स्थापित करण्यात आली असून सदर समिती दर तिमाहीस बैठक घेऊन राकावियो रुग्णालयातील सोई सुविधांबाबत घेते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) येथील कृषि विभाग व पेण तहसिल येथे रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१५) * १४७०५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.आनंद ठाकूर, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील कृषि विभाग व पेण तहसिल येथे रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१२ ते २०१४ या तीन वर्षात जॉब कार्डधारक शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी शेत, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर फळबागा लागवड कार्यक्रमात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापी याबाबत दिनांक ३१.१०.२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज प्राप्त झाला असून या प्रकरणी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, रायगड-अलिबाग यांच्यामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.
(२) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, रायगड यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.
(३) चौकशीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामपंचायत मधील कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबत

**(१६) * १५२५५ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११०५३ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायत मधील कर्मचाऱ्यांना ५१०० ते ७१०० इतके अल्यल्प वेतन देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेच्या वर्ग ४ च्या कर्मचाऱ्याप्रमाणे सेवाप्रवेश नियम बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेवाप्रवेश नियम बंधनकारक असतांना मात्र त्यांना जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ०१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठवून विनंती केली, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेची वेतनश्रेणी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) विषयास अनुसरुन नागपूर विभागातील लोकप्रतिनिधींचे दिनांक २१.०८.२०१५ चे पत्र शासनास प्राप्त झाले आहे हे खरे आहे.

(५) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(६) अशी बाब नाही.

-----------------

**ठाणे येथील सिव्हील रुग्णालयात नवीन शवागार व**
**शवविच्छेदन केंद्र बांधण्याबाबत**

**(१७) * १४९९१ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८८७ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सिव्हील रुग्णालयातील शवागारात केवळ १५ मृतदेहच ठेवण्याची क्षमता असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शवागारात एकावर एक अशा अवस्थेत २५ ते ३० मृतदेह ठेवले जात असल्यामुळे मृतदेहाची ओळख पटण्यासाठी नातेवाईकांना ७ ते ८ तास ताटकळत उभे रहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिव्हील रुग्णालयात सुसज्ज नवीन शवागार (पोस्टपार्टम सेन्टर) उभारण्यात यावे अशी मागणी स्थानिक जनतेने उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे, मा.ठाणे जिल्हा पालकमंत्री यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार नवीन शवागार व शवविच्छेदन केंद्र बांधण्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडून दिनांक ९ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे तसा प्रस्ताव देखील पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नवीन शवागार बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही. सदर शवागारात केवळ १२ मृतदेह ठेवण्याची क्षमता आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात नविन शवागारात व शवविच्छेदन केंद्राबाबत लोकप्रतिनिधी व जनतेच्या मागणीस अनुसरुन जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांनी संचालनालयाकडे मागणी केली असून त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांची मंजूर झालेली वैद्यकिय देयके अदा करण्याबाबत

**(१८) * १४७५८ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या गलथान कारभारामुळे प्राथमिक शाळेतील शिक्षकांची मंजूर झालेली लाखो रुपयांची वैद्यकिय देयके शिक्षकांना मिळाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुषंगाने सदर शिक्षकांची वैद्यकिय देयके अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२), (३) व (४) पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे सन २०१५-२०१६ मध्ये एकूण २६५ वैद्यकीय प्रतिपूर्ती आदेश मंजूर असून त्यामध्ये एकूण रक्कम रुपये २,१४,७२,३८३/- मंजूर केलेली आहे. अनुदान उपलब्ध नसल्याने सदर रक्कम संबंधितास अदा करता आली नाही. अनुदान उपलब्ध करुन घेऊन संबंधितांस वैद्यकीय प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यात कार्यवाही केली जात आहे.

-----------------

## राज्यातील महिला कर्मचारी, अधिकारी व शिक्षक यांना बालसंगोपनासाठी दोन वर्षांपर्यंत भरपगारी रजा मिळण्याबाबत

**(१९) * १५१५७ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२३९६ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारच्या सेवेतील व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला कर्मचारी व अधिकारी तसेच अनुदानित शाळा व महाविद्यालयातील महिला शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचारी यांना बाल संगोपनासाठी दोन वर्षांपर्यंत केंद्राप्रमाणे भरपगारी रजा देण्याबाबत आणि पुरूष कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याबाबत राज्य सरकारी कर्मचारी संघटना, शिक्षक भारती आणि महिला संघटनांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे. बालसंगोपनाबाबत दोन वर्षापर्यंत केंद्राप्रमाणे भरपगारी रजा देण्याबाबत मागणी प्राप्त झालेली आहे. तथापि, पुरुष कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याबाबतची मागणी केल्याचे दिसून आले नाही.

(२) व (३) राज्य शासनात महिला कर्मचाऱ्यांची मोठी संख्या आहे व त्यांना २ वर्षाची बालसंगोपन रजा लागू केल्यास शासकीय कामकाजावर होणारा विपरीत परिणाम विचारात घेऊन अशी रजा देण्याचे धोरण लागू न करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

-----------------

## पालघर तालुक्यातील महामार्गावरील अनधिकृत बांधकामे थांबविण्याबाबत

**(२०) * १५८०६ श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर तालुक्यातील मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पेल्हार, ससुनवघर, सातिवली, वालीव, टाकवहाल, जव्हार फाटा, नांदगाव, हालोली या भागात अनधिकृत धाबे, व्यापारी गाळे, हॉटेल्स यांची बेकायदा बांधकामे उभी राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी कार्यालयासमोरच ही बांधकामे सुरु असून, महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे सदर कामे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अनधिकृत बांधकामे थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे. प्रश्नात नमूद केलली सातिवली, टाकवाहाळ, जव्हार फाटा, नांदगाव व हालोली ही गाव डहाणू तालुक्यातील नसून पालघर तालुक्यातील आहेत. तसेच, पेल्हार, वालीव व ससुनवघर ही गावे वसई-विरार महानगरपालिकेमध्ये समाविष्ट आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर टाकवाहाळ, जव्हार फाटा या भागात अनधिकृत धाबे, व्यापारी गाळे, हॉटेल्स यांची बेकायदा बांधकामे झालेली नाहीत. तथापि, पालघर तालुक्यातील महामार्गालगतच्या इतर अनधिकृत बांधकामांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येत आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील नांदगाव तर्फे मनोर, आवढाणी येथील बेकायदा बांधकामे निष्कासीत करण्यात आली आहेत. तसेच, सातिवली व हालोली येथील अनधिकृत बांधकामाविरुध्द दंडनिय कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) येथील आदिवासी भागातील ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२१) * १५६९०  श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) येथील आदिवासी भागातील ग्रामीण रुग्णालयात तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रत्येकी ४ वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत व मूलभूत सोयी-सुविधाबाबत सामाजिक संघटना यांनी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री तसेच जिल्हाधिकारी, पालघर, महासंचालक, आरोग्य संचालक यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासींना आरोग्याच्या सर्व मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत व शासकीय अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अशा स्वरुपाचे निवेदन दिल्याचे आढळून आलेले नाही.
(२) पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यामध्ये १ ग्रामीण रुग्णालय व ४ प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु आहेत. ग्रामीण रुग्णालय वाडा येथे वैद्यकीय अधिक्षकाचे १ पद मंजूर असून ते रिक्त आहे, वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ३ पदे मंजूर असून सदर पदे भरलेली आहेत. त्यापैकी एक वैद्यकीय अधिकारी पदव्युत्तर अभ्यासक्रमास गेलेले असून एक वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय कारणास्तव रजेवर आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमास गेलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागी उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथील एका वैद्यकीय अधिकाऱ्याची सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यांचे मार्फत रुग्णसेवा पुरविण्यात येत आहेत. ग्रामीण रुग्णालय वाडा येथे प्रयोगशाळा, क्ष-किरण, शवविच्छेदन, नेत्रचिकित्सा इत्यादी सेवा उपलब्ध आहेत.

वाडा तालुक्यातील ४ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रत्येकी २ पदे मंजूर असून प्राथमिक आरोग्य केंद्र कुडूस, प्राथमिक आरोग्य केंद्र खानवली व प्राथमिक आरोग्य केंद्र गो-हा येथील दोन्ही पदे भरलेली आहेत व प्राथमिक आरोग्य केंद्र परळी येथे १ पद भरलेले व १ पद रिक्त आहे. सदर आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक रुग्णसेवा तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयातील मजूरांना कामे मिळत नसल्याने मजूरांचे शहराकडे स्थलांतर होत असल्याबाबत**

**(२२) * १५०५६ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात मोठया प्रमाणात दुष्काळी परिस्थिती असून बिलोली तालुक्यातील मजूरांना कामे मिळत नसल्याने व ग्रामीण भागात कामे उपलब्ध नसल्याने नागरिकांना शहराकडे कामासाठी जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी-२०१६ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मजूरांना ग्रामीण भागात कामे उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंतप्रधान योजनेंतर्गत राज्यातून रस्ते तयार करण्याबाबतचे प्रस्ताव केंद्र शासनाला पाठविण्याबाबत**

**(२३) * १४८१९ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान योजनेंतर्गत सन २०१५ करिता राज्यातून रस्ते तयार करण्याबाबतचे प्रस्ताव पाठविण्यात न आल्याने राज्याला केंद्र शासनाकडून निधी मिळू शकला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव कधीपर्यंत पाठविणे अपेक्षित होते व ते कधी पाठविण्यात आले आहे,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत भाग-१ व भाग-२ साठी सुमारे रु.३००४ कोटीचा कार्यक्रम मंजूर केला आहे. त्याकरीता केंद्र शासनाने सन २०१४-१५ मध्ये रु.२०७ कोटी व सन २०१५-१६ मध्ये रु.४९२ कोटी असा एकूण रु.६९९ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या मंजूर कार्यक्रमाच्या प्रमाणात निधी उपलब्धतेसाठी वेळोवेळी केंद्र शासनाकडे राज्यशासन स्तरावरून पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत रोजगार हमी योजनेमार्फत करण्यात आलेल्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२४) * १४९११ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१० ते २०१५ अखेर या पाच वर्षात मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात ग्रामपंचायती अंतर्गत १२७ कामे करण्यात आली असून त्यात झालेल्या गैरव्यवहाराबाबत २४ ग्रामपंचायती अंतर्गत कामे करणाऱ्या यंत्रणेवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुन्हे दाखल झालेल्या काम करणाऱ्या यंत्रणेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) सन २०१० ते २०१५ यावर्षात मुखेड तालुक्यात २४ ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या १२७ कामांमधील गैरव्यवहाराच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गुन्हे दाखल झालेल्या ८ ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक, ३ उप अभियंता/शाखा अभियंता व १ कृषि अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. तसेच २ सहायक कार्यक्रम अधिकारी (कंत्राटी), ५ अभियंता (कंत्राटी) व ९ ग्रामरोजगार सेवक यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

--------------------------------

## रत्नागिरी जिल्ह्यात दूषित पाणीपुरवठ्यामुळे साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(२५) * १५५५० श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामपंचायती तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत जिल्ह्यातील २ हजार १७२ पाणी नमुने तपासण्यात आले असून या नमुन्यापैकी तब्बल १२१ नमुन्यांचे पाणी दुषित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुषित पाण्यामुळे साथीच्या आजारांच्या प्रादुर्भावास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) जलजन्य साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीना योग्य गुणवत्तेच्या टी.सी.एलचा पुरवठा तसेच जलसुरक्षकांमार्फत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे योग्य गुणवत्तेच्या टी.सी.एल. द्वारे दैनंदिन शुद्धीकरण करण्यात येते. पाणी स्त्रोताभवतालच्या परिसराची स्वच्छता राखणे. जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर होणाऱ्या सभांमध्ये दुषित असलेल्या पाणी नमुन्यांबाबत दरमहा बैठक आयोजित केली जाते. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत सर्व ग्रामपंचायतीना नियमित पाणी शुद्धीकरणाबाबत मार्गदर्शन व आरोग्य शिक्षण देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील सावित्रीच्या मुलींची शिक्षणासाठी पायपीट सुरु असल्याबाबत

**(२६) * १५४६९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकवे बुद्रुक (जि.पुणे) आंदर मावळातील राजपुरी, बेलज, कल्हाट, कोडिंवडे, कचेरवाडी, घोणशेत, पारवडी, कुसवली या गावातील शेकडो सावित्रीच्या मुलींची शिक्षणासाठी पायपीट सुरु असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हा परिषदेकडून ७ वी पर्यंतच मुलींना अनुदानावर सायकली दिल्या जात आहेत मात्र त्यापुढील वर्गातील मुलींना सायकली दिल्या जात नसल्याने ७ कि.मी. अंतर त्यांना चालत जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय,

पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत सन २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी तील मुलींना सायकलीचे वाटप करण्यात आले आहे.

तसेच सन २०१५-१६ मध्ये इयत्ता ५ वी व ७ वीच्या अनुसूचित जातीच्या मुलींना तसेच ५ वी तील सर्वसाधारण मुली आणि गतवर्षाच्या शिल्लक राहिलेल्या ६ वी तील मुलींना सायकल वाटप करण्यात येणार आहे.

(३) शासन निर्णय क्र.झेडपीए २०१३/प्र.क्र.७६/परा-१, दिनांक २४.०१.२०१४ या निर्णयाने ५ वी ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी सायकल पुरविणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुंभार समाजाला मातीचे भांडे भाजण्याकरीता स्वस्त दरात लाकडे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) * १५२२६ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मातीचे तयार केलेले भांडे भाजण्याकरिता मातीकाम कारागिरांना लाकडाची आत्यंतिक गरज असते, मातीपासून भांडी तयार करणारा कुंभार समाज व त्यातील कारागीर आर्थिकदृष्टया अत्यंत दुर्बल असल्यामुळे त्यांना बाजारातून महाग लाकडे विकत घेण्यास फार त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मातीचे माठ, रांजण, शिल्प बनविणाऱ्या कुंभार समाजातील कारागिरांना स्वस्त दरात लाकडे उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या मातीकाम कारागिरांना वन विभागामार्फत विक्री करिता लिलावाद्वारे लाकूड बीट आरक्षित करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) या विषयाबाबत महाराष्ट्र कुंभार समाज महासंघ, पुणे यांनी त्यांच्याकडील दिनांक १८.११.२०१४ च्या पत्रान्वये शासनास निवेदन सादर केलेले आहे.

(२), (३) व (४) कुंभार समाजातील कारागिरांना स्वस्त दरात लाकडे उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यात एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत कार्यरत असलेले अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मागण्यांबाबत

**(२८) * १५५०७ श्री.अमरिशभाई पटेल, ॲड.अनिल परब, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोरी तालुक्यातील एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना शासनाकडून गेल्या चार महिन्यापासून मानधन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र अंगणवाडी सहायक प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदान येथे एक दिवसीय धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंदोलकांना मा.महिला व बाल विकास मंत्री यांनी भेट देऊन दिनांक १५ ते २३ जानेवारी, २०१६ या कालावधी मध्ये मंत्रालयात बैठक घेण्याचे आश्वासन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मंत्रालयात सर्व संबंधितांची बैठक केव्हा झाली व त्या बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्याअंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे दोन प्रकल्प दिंडोरी आणि दिंडोरी (उमराळे) या प्रकल्पांतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना माहे नोव्हेंबर, २०१५ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र अंगणवाडी सहाय्यक प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका संघटनेच्या पदाधिकारी यांचेबरोबर दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषद अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे कामकाज करीत असलेल्या गट क व ड मधील सर्व कर्मचारी वर्ग महिला व बाल विकास विभागाकडे कायमस्वरुपी वर्ग व हस्तांतरीत करण्याबाबत प्रस्तावावर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात यावे असा निर्णय झाला आहे.

(५) विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ येथील नागरिकांना माती खाण्याचे व्यसन लागल्याबाबत**

**(२९) * १५७७६ श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील नागरिकांना माती खाण्याचे व्यसन लागल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर माती नागरिकांच्या जीवनास घातक ठरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ व अकोला जिल्हयातील प्रकल्पांमधील पाणीसाठा वाढविण्याबाबत**

**(३०) * १४६४१ श्री.हरिसिंग राठोड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील अरुणावती, अकोला जिल्हयातील काटेपुर्णा, बुलढाणा नळगंगा व पेनटाकळी प्रकल्पात २०% जलसाठा शिल्लक असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागांतर्गत चार मोठे प्रकल्पातील जलसाठा २०% झाल्याने यवतमाळ, वाशिम व बुलढाणा जिल्हयात पाणी टंचाई झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पातील पाणीसाठा वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर अखेर अरुणावती प्रकल्पामध्ये १७.०९ टक्के, अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा प्रकल्पामध्ये २३.९४ टक्के, नळगंगा प्रकल्पामध्ये १९.४२ टक्के व पेनटाकळी प्रकल्पामध्ये ३१.१८ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. महसूल व वन विभागाच्या दिनांक ७.९.२०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पिण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यकतेनुसार पाणी आरक्षित करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकल्पातील पाणीसाठा वाढविणे तांत्रिक दृष्ट्या/जलशास्त्रीय दृष्ट्या शक्य नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) * १५४९६ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी एकरकमी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी येत्या चार महिन्यात निर्णय घेतला जाणार असून यासाठी जागतिक बँकेकडून अर्थसहाय्य घेण्याची शासनाची तयारी असल्याची माहिती मा.जलसंपदा मंत्री यांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास म्हैसाळ योजनेच्या डोंगरवाडी प्रकल्पाचे उद्घाटनानंतर भोसे येथे झालेल्या शेतकरी मेळाव्यात दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती प्रकल्प रखडलेले आहेत, त्यासाठी सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती रुपयांची शासनास गरज आहे, त्यासाठी शासनाने आतापर्यंत सदरचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोणती उपायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) तसेच पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: सातारा जिल्ह्यात अनेक तालुके दुष्काळग्रस्त असून त्यात अनेक प्रकल्प निधीअभावी बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) राज्यातील बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी, वेगवेगळया वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य घेण्याची शासनाची तयारी असल्याचे मा. मंत्री, जलसंपदा यांनी म्हैसाळ योजनेच्या उद्घाटन प्रसंगी सांगितले.

(२) राज्यात ४०३ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. या प्रकल्पांची उर्वरीत किंमत सुमारे रुपये ७४,००० कोटी इतकी आहे. पाटबंधारे प्रकल्पांचे दायित्व मोठे असल्याने प्रकल्प पूर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहे याबाबतचा आढावा घेऊन प्राथम्य क्रमानुसार आर्थिक गुंतवणूक करण्याचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार अमरावती प्रदेशातील अनुशेष निर्मुलन कार्यक्रमातील सर्व प्रकल्प व पुढील ३ वर्षात सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकेल अशा अन्य जिल्हयातील प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येत आहे.

(३) व (४) हे खरे नाही. अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश या नुसार उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रकल्पाची कामे करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील जलसंधारणाची कामे पुर्ण करण्याबाबत**

**(३२) * १६३०८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११९७१ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १ एप्रिल, २०१५ नंतर तसेच दिनांक १ एप्रिल, २०१५ पुर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्ष क्षेत्रिय कामे सुरु झालेली नाहीत, अशा सर्व योजनांना (० ते २५० हेक्टर) महामंडळाकडून स्थगिती देण्यांत आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे यांचेसह त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याबाबत शासन निर्णय क्र. मजम-२०१५/प्रक्र६६/जल-३, दि. ८ मे, २०१५ रोजी निर्गमित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने एकूण २३३० योजनांचा तपासणी अहवाल दिनांक २८ जुलै, २०१५ अन्वये महामंडळास प्राप्त झाला असून ह्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णयास्तव ठेवण्यात आलेल्या सदर अहवालावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर जलसंधारणाची कामे होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

दिनांक १ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या व दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्षात क्षेत्रिय कामे सुरु झालेली नाहीत, अशा सर्व योजनांची कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) स्थगित केलेल्या कामांपैकी जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत टंचाई मुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावांमधील १०१ कामांची स्थगिती उठविण्यात आली असून दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर जलसंधारणाची कामे हाती घेण्याबाबत महामंडळामार्फत पुढील ५ वर्षाचा आराखडा तयार करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वनविभाग व सामाजिक वनीकरणमधील रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या वन कामगारांना सेवेत कायम करण्याबाबत

**(३३) * १६५९१ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनविभाग व सामाजिक वनीकरण मधील रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या वन कामगारांची माहिती व सेवा जेष्ठता यादी त्यांना शासन सेवेत कायम करण्याचेदृष्टीने शासनाने मागविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलडाणा जिल्हयातील रोजगार हमी योजनेंतर्गत २० ते २५ वर्षापासून काम करणाऱ्या ३०० वन कामगारांचा या यादीत समावेश नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कामगारांचा समावेश या यादीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: योजना/योजनेत्तर व अंशत: रोजगार हमी योजनेंतर्गत तसेच पूर्णत: रोजगार हमी योजनेंतर्गत काम केलेल्या रोजंदारी वनमजुरांची माहिती प्राप्त करण्याचे काम सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

याबाबतही माहिती प्राप्त करून घेण्याचे काम सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील तिलारी प्रकल्पासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(३४) * १६६६४ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील तिलारी प्रकल्पासाठी मा.पंतप्रधान यांनी रुपये ३२० कोटी देण्याची घोषणा माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निधी राज्य शासनाला प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, हया निधीचा वापर कशाप्रकारे करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) तिलारी प्रकल्पासाठी रु. ३२० कोटी देण्याची घोषणा मा.पंतप्रधानांनी केली हे खरे नाही.

मात्र तिलारी प्रकल्पाची कामे पूर्ण करणेसाठी रु. ३२० कोटीची गरज असून पंतप्रधान कृषी सिंचाई योजनेत हा प्रकल्प समाविष्ट करणेत आला आहे.

(२) केंद्र शासनाकडून अद्यापी निधी प्राप्त झालेला नाही. मात्र राज्य शासनाने सन २०१५-१६ अर्थसंकल्पात रु. १६.०० कोटीची तरतूद केली होती. तसेच पुनर्विनियोजनाने रु. ७१.०० कोटी अतिरिक्त निधी मंजूर केला आहे.
(३) व (४) या निधीचा उपयोग प्रकल्पाची उर्वरित कामे पूर्ण करणेसाठी करणेत येणार आहे. यातून ४०० हेक्टर अतिरिक्त सिंचनक्षमता निर्माण करणे प्रस्तावित आहे.

-----------------

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील विस्थापितांच्या पुनर्वसनाबाबत**

**(३५) * १६६९१ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमधील कुसापूर रवदी, आडोशी, माडोशी, तांबी, खिरखिंडी आणि वासोटा या ७ गावांचे पुनर्वसन भिवंडी (जि.ठाणे) जवळील एकासाला आणि सागाव या गावांच्या जवळ होत असून स्थलांतरांची प्रक्रिया माहे मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे वन खात्याने निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्वसनासाठीच्या जमिनीवर “नवीन शर्त” हा शिक्का असलेली जमीन परवानगी शिवाय विकता येत नाही तसेच सह्याद्रीतील सदरहू ७ गावाच्या पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु होवूनही हा शिक्का पुनर्वसनातील जमीनीवर अद्याप पडलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सह्याद्रीमधील विस्थापितांची प्रक्रिया तांत्रिक अडचणीत सापडली असून पुनर्वसनाच्या जमिनीचे उतारे पुनर्वसितांच्या नावे होताच, बिल्डर लॉबीकडून त्यांना आमिषे दाखविली जाऊन सदर जमीन विकासकाच्या ताब्यात जाऊन प्रकल्पाग्रस्तांची या विकासकांकडून कोणत्याही प्रकारे फसवणूक वा दबाब येवून नये व पुनर्वसन साठीचा जमिनीवर “नवीन शहर” हा शिक्का विनाविलंब उमटविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
सद्य:स्थितीत पुनर्वसनाची कार्यवाही सुरू आहे. पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर ७/१२ सदरी “नवीन शर्त” बाबत आवश्यक त्या नोंदी घेण्यात येतील.

(३) व (४) पुनर्वसित कुटुंबांसाठी गावठाण निश्चित करण्यात येत असून “नवीन शहर” हा शिक्का उमटविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती विभागात पाण्याची सिंचन क्षमता वाढवण्याबाबत**

**(३६) * १६९४९ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागात सरासरीपेक्षा कमी पाणी उपलब्ध असल्याने तापी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी मागणीचा प्रस्ताव तयार करण्याविषयी मा.राज्यपालांनी दिलेल्या निर्देशांकडे शासनाने दुर्लक्ष केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तापी खोऱ्यातील ३३ टीएमसी पाणी उपलब्ध असूनही तापी खोऱ्यातील पाण्यापासून पश्चिम विदर्भ वंचित राहत आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, अमरावती विभागात सिंचन क्षमता वाढवण्यासाठी या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही. मा.राज्यपालांच्या निर्देशानुसार अतिरिक्त पाणी मागणी केंद्रीय जल आयोगाकडे करण्यात आली आहे. याबाबत निर्णयानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२) अय्यंगार समितीच्या अहवालाप्रमाणे तापी खोऱ्यामधून विदर्भाचा हिस्सा म्हणून १८९७.२४७ दलघमी तसेच शासन पत्र दिनांक १७/११/२०१४ अन्वये मंजूर पश्चिम विदर्भातील जिगांव मोठ्या प्रकल्पाची विश्वासार्हता कमी करुन उपलब्ध झालेले ७१०.५१ दलघमी पाणी असे एकूण २६०७.७५७ दलघमी (९२.०८ अघफु) पाणी विदर्भासाठी वापरण्यास शासनाची मान्यता आहे. त्यानुसार प्रकल्पांचे नियोजन केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या १९ रस्त्यांची कामे सुरु करण्याबाबत

**(३७) * १७०१५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत जिल्ह्यातील एकूण १९ रस्त्यांची निवड करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवडण्यात आलेल्या रस्त्यांची कामे सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) निवड करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामाचे DPR तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. DPR अंतिम झाल्यानंतर त्यास शासनाची मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात सोईसुविधा पुरविण्याबाबत

**(३८) * १७१९२ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.जर्नादन चांदूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) तालुका हा आदिवासी तालुका असून या तालुक्यातील दोन ग्रामीण रुग्णालयाची व प्राथमिक आरोग्य केंद्राची सेवा अपयशी ठरलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात अपुऱ्या सोयी-सुविधा, अस्वच्छता, अपूरा कर्मचारी वर्ग यामुळे आदिवासी रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची पूर्तता व आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

ईगतपुरी तालुक्यात ८ प्राथमिक आरोग्य केंद्र असून दिनांक ०१.०४.२०१५ ते दिनांक ३१.०१.२०१६ या कालावधीमध्ये एकूण ८९८७५ ओपीडी, ५२४० आयपीडी, ४६६ प्रसूती व ८९ टक्के लसीकरण करण्यात आलेले आहे. तसेच सदर सर्व ठिकाणी मंजूर असलेली वैद्‌यकीय अधिकाऱ्यांची सर्व पदे भरलेली आहेत. त्याठिकाणी आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाने जलयुक्त शिवाराच्या बंधाऱ्याच्या कामांना निधीअभावी स्थगिती दिल्याबाबत

**(३९) * १७३५० श्री.सुभाष झांबड, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ११५६७ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाने लघुसिंचनांतर्गत येणाऱ्या जलयुक्त शिवाराच्या २५० बंधाऱ्याच्या संचिकांना कार्यादेश असताना निधीअभावी स्थगिती दिल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव शासनाने जलयुक्त शिवार योजनेसाठी ३७ कोटी १९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला त्यातील २१ कोटी ९९ लाख रुपये लघुसिंचन विभागाला देण्याचे आदेश निर्गमित केले परंतु जिल्हा नियोजन विभागाने हा निधी समितीच्या नियत्वेच्या कामासाठी नियमबाह्य वापरल्यामुळे जलयुक्त शिवारांतर्गत बांधण्यात येणारी बंधाऱ्याची कामे स्थगित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सदर विभागामार्फत २८५ कामासाठी निविदा स्विकृत करण्यात आल्या आहेत. निविदेवर होणारा खर्च व उपलब्ध निधी विचारात घेता २८५ योजनांपैकी ४३ कामांना स्थगिती देण्यात आली व १४ कामे रद्द करणे प्रस्तावित आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यासाठी रु.२४२.१९ कोटी नियतव्यय मंजूर झाला होता त्यामध्ये जलयुक्त शिवार अभियानातंर्गत घ्यावयाच्या कामासाठी रु.३७.१९ कोटी इतका नियतव्यय अंतर्भूत असून जलयुक्त शिवाराच्या जिल्हास्तरीय बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार सदर निधीचे वितरण कृषी विभागाला १४.२७ कोटी, उपवन संरक्षण विभाग ०.३९ लक्ष, कार्यकारी अभियंता जि.प.सिंचन विभाग रु.१.५८ कोटी व लघुसिंचन विभागस रु.२०.९५ कोटी निधी देण्यात आला आहे.

(३) जलयुक्त शिवार अभियानातंर्गत औरंगाबाद जिल्ह्यासाठी शासनाकडून (Gap Funding) रु.३८.६९ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच त्यातून स्थगित व रद्द कामे पुन्हा सुरु करण्यात येणार आहेत. नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवेगांव नागझीरा अभयारण्यामधील व्याघ्र प्रकल्पातील सुरक्षा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४०) * १७३७१ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवेगांव नागझीरा अभयारण्याला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देऊनही या प्रकल्पातील सुरक्षा अधिकाऱ्यांची पदे व अन्य पदे रिक्त असल्याने अभयारण्यातील प्राण्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पात वाघांच्या शिकारीसाठी वापरले जाणारे सापळे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रकल्पातील प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी तसेच सदर प्रकल्पातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे संरक्षणासाठी १०- वनक्षेत्रपाल, २६- वनपाल व १४४-वनरक्षक अशी पदे मंजूर असून त्यापैकी ०५-वनपाल व ०२- वनरक्षकांची पदे रिक्त आहेत.

तसेच ह्या व्यतिरिक्त नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राकरिता विशेष व्याघ्र संरक्षण दलाची स्थापना करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने वनरक्षक व वननिरीक्षक संवर्गातील पदभरतीची प्रक्रिया सुरु असून पात्र अंतिम उमदेवारांची निवडसूची तयार करण्याचे काम सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच संरक्षणाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

१) क्षेत्रीय कर्मचारी व अधिकाऱ्यामार्फत वेळोवेळी अतिसंवदेनशिल व संवेदनशील भागात गस्ती करुन नियंत्रण ठेवण्यात येत आहे.
२) वायरलेस यंत्रणा/उपलब्ध वाहने व मनुष्यबळाचा पूर्ण क्षमतेत वापर करणे सुरु आहे.
३) प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी ५६ संरक्षण कुट्या तयार करण्यात आल्या आहेत.
४) गस्तीत GPS व मेटल डिटेक्टरचा उपयोग करण्यात येत आहे.
५) आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके असून त्याद्वारे वाहनांची नेहमी तपासणी करण्यात येते.
६) वाघांच्या अधिवासात मुबलक पाणी उपलब्ध व्हावे याकरिता व्याघ्र राखीव

क्षेत्रात नैसर्गिक पाणवठे-९७ व कृत्रिम पाणवठे-१३१, खोदतळे-०२ असे एकुण २४० पाणवठे उपलब्ध आहेत.

७) वन्यप्राणी विशेषत: वाघांच्या हालचालींचा मागोवा घेण्याकरिता त्यांच्या जाणे-येण्याचे संभाव्य रस्त्यावर, पाणस्थळांजवळ नियमितपणे कॅमेरा ट्रॅप लावण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर शहरासाठी उजनी धरणातून पाणी सोडण्याच्या मागणीबाबत**

**(४१) * १७६०२ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरासाठी उजनी धरणातून पाणी सोडण्याची मागणी जिल्हाधिकारी व लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे महापालिका आयुक्तांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकीत २२ कोटीची थकबाकी भरल्याशिवाय पाणी सोडण्यात येणार नाही असा निर्णय जिल्हाधिकारी व लाभक्षेत्र प्राधिकरणाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) नाही.

(३) सोलापूर शहरासाठी दिनांक ३०.०१.२०१६ ते ०७.०२.२०१६ या कालावधीत ३.९६ टीएमसी पाणी उजनी धरणातून भीमा नदीत सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू करण्याबाबत

**(४२) * १७७३२ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू करणाचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सातवा वेतन लागू झाल्यास राज्याला किती आर्थिक भार सोसावा लागेल,

(४) असल्यास, यामध्ये निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुध्दा सातवा वेतन लागू करणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) प्रचलित पध्दतीनुसार केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर राज्य शासन समिती नियुक्त करते व सदर समितीच्या शिफारशीनुसार वेतन आयोग लागू करण्याची कार्यवाही करण्यात येते. केंद्र शासनाने केंद्रीय सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी अद्याप केंद्रीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या नाहीत.

-----------------

## गोदावरी खोऱ्याच्या आराखडयाबाबत

**(४३) * १७७९३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने गोदावरी खोऱ्याचा आराखडा तयार करुन जनतेच्या अभिप्राय आणि आक्षेपासाठी उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी खोऱ्यातील विशेषत: मराठवाड्यातील पाणी टंचाई निवारण्याचा दृष्टीकोन आराखड्यात नसल्याने या आराखड्यासंदर्भात मराठवाडा विकास प्रतिष्ठानने आपले आक्षेप आणि अभिप्राय महामंडळास सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आक्षेप व अभिप्रायाचे स्वरुप काय आहे व त्याबाबत पुढे कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) मराठवाडा विकास प्रतिष्ठान यांनी सूचना व आक्षेपाद्वारे जल आराखड्याबाबतच्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. तसेच काही त्रुटी निदर्शनास आणल्या आहेत.

या संदर्भात दिनांक १९/११/२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य जल परिषदेच्या दुसऱ्या बैठकीत "सदरहू गोदावरी खोऱ्याच्या जल आराखड्यामध्ये विविध Stakeholders यांनी केलेल्या सूचना विचारात घेऊन परिपूर्ण जल आराखडा तयार करावा. या कामाकरिता अधिकाऱ्यांची एक कृति गट (Dedicated team) तयार करण्यात यावी. या Team ला मार्गदर्शन करण्यासाठी कार्यरत तसेच निवृत्त अधिकारी व खाजगी क्षेत्रातील तज्ञांच्या गटाची नियुक्ती करावी. सदरहू सुधारणासह अद्यावत जल आराखड्यास तीन महिन्याच्या कालावधीमध्ये राज्य जल परिषदेची मान्यता घ्यावी." असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

याबाबतचा कृति गट नेमणेबाबतची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(४४) * १८१६६ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेमध्ये सन २०१५-१६ या वर्षातील तेरावा वित्त आयोग व बी.आर.जी.एफ योजनेची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी संपूनही अद्यापही १० कोटी ५१ लाख रुपये अखर्चित असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, सदर निधी प्राप्त होऊनही विकास कामावर खर्च न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) चंद्रपूर जिल्हा परिषदेमध्ये सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील तेराव्या वित्त आयोगाचा माहे डिसेंबर, २०१५ अखेर रु.२.३१ कोटी इतका निधी अखर्चित होता. तेराव्या वित्त आयोगाचा अखर्चित निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच मागास क्षेत्र अनुदान निधी (बी.आर.जी.एफ.) अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ अखेर अखर्चित निधी एकूण रु.१२.८३ कोटी इतका शिल्लक असून सदर अखर्चित निधी खर्च करण्यास दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) तेराव्या वित्त आयोगाच्या अखर्चित निधी खर्च करण्यास दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच बी.आर.जी.एफ. अंतर्गत अखर्चित निधी दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत खर्च करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे कोणावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) तेराव्या वित्त आयोगाच्या अखर्चित निधीतून घ्यावयाच्या विकास कामांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत संपूर्ण निधी खर्च करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

तसेच बी.आर.जी.एफ. अंतर्गत शिल्लक असलेल्या निधीचे ग्रामीण स्वराज्य संस्था व नागरी स्वराज्य संस्था यांचेकडून नियोजन करण्यात आले असून अखर्चित निधीच्या विकास आराखड्यास जिल्हा नियोजन समितीची मंजुरी घेऊन शासनाने दिलेली विहित मुदत दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत अखर्चित निधी खर्च करण्याचे नियोजन केले आहे.

-----------------

**पंचायत समिती, अकोला अंतर्गत ग्रामसेवकांच्या नियमबाह्य केलेल्या बदल्यांची चौकशी करण्याबाबत**

**(४५) * १६२०४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती, अकोला अंतर्गत ग्रामसेवकांच्या नियमबाह्य केलेल्या बदल्यांची चौकशी करुन दोषी गटविकास अधिकारी यांना तात्काळ निलंबित करण्याबाबत मा.मंत्री व मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व वित्त व नियोजन यांना दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त दोषी गटविकास अधिकाऱ्याला निलंबित करण्याबाबत विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच ८ महिन्यांपूर्वी रुजू झालेले ग्रामविकास अधिकारी मांजरे हे कोणत्याही ग्रामपंचायतीला कार्यरत नसतांना त्यांना वेतन अदा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्राथमिक चौकशीअंती संबंधित गट विकास अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

(३) व (४) श्री.मांजरे ग्रामविकास अधिकारी ह्यांना समिती, अकोला कार्यालयातील पंचायत विभागामध्ये, कार्यालयीन कामकाज करणेस्तव रुजू करुन घेण्यात आले होते. तसेच त्यांना नियमानुसारच वेतन अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

**(४६) * १५२९७ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद सिंचन विभागातंर्गत अनेक जुने कोल्हापूरी बंधाऱ्याचे दुरुस्तीचे कामाकडे जिल्हापरिषद सिंचाई विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोल्हापूरी बंधाऱ्यांचे दुरुस्तीचे कामे करण्यात येवून त्याकरीता निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मागील १० वर्षामध्ये १०२ कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे. त्याकरिता रुपये ५३३.६९ लक्ष निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले अभियान अंतर्गत रुपये ५७.३७ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला असून त्यामध्ये मार्च, २०१६ अखेरपर्यंत २९ बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात येत आहे.

-----------------

**जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून राज्यातील नद्यांचे पुनर्जीवन करण्याच्या निर्णयाबाबत**

**(४७) * १५३९३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून राज्यातील नद्यांचे पुनर्जीवन करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नदी/ओढा/नालामधील गाळ काढणे, सरळीकरण व खोलीकरण करणे ही कामे लोकसहभागातून करून नदी/ओढा/नाला पुनर्जीवन करण्यास ज्या गावातील रहिवाशांनी पुढाकार घेऊन लोकवर्गणी/श्रमदानाद्वारे मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे किंवा देत आहेत, अशा गावांमध्ये घेण्यात आलेल्या नदी/ओढा/नाला पुनर्जीवन कार्यक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी अभिसरणाच्या माध्यमातून नदी पुनर्जीवन कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर कार्यक्रम DPAP क्षेत्रात प्राधान्याने राबवायचा आहे. नदी/नाला/ओढ्यातील गाळ काढणे, खोलीकरण/रुंदीकरण वृक्ष लागवड, जनजागृती, पर्यवेक्षण इ.मध्ये लोकसहभाग आवश्यक, सिमेंट बंधाऱ्यांसाठी शासन स्तरावरुन निधी देण्यात येईल आणि दुरुस्ती, पाणलोट, वृक्षलागवड व इतर कामांसाठी अभिसरणाद्वारे निधी घेणे आवश्यक हा कार्यक्रम जलयुक्त शिवाराचा भाग असल्याने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व तालुका स्तरावर प्रांत अधिकारी यांच्या समितीमार्फत राबविण्यात येणार आहे.

(३) नदी पुनर्जीवन कार्यक्रमात नद्यांची निवड करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सादरीकरण करण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार आतापर्यंत १२ जिल्ह्यातील ८६ नदी/नाल्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून साखळी सिमेंट नाला बांधासाठी रुपये २२३१.११४ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

-----------------

**मु.पो. खोडाळे (ता.मोखाडा, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूती झालेल्या महिलेस रुग्णवाहिका उपलब्ध न केल्याबाबत**

**(४८) * १५७७१ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो. खोडाळे (ता.मोखाडा, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मंजुळारण ही आदिवासी महिला दि. ७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रसूत झाल्यानंतर दि. ८ डिसेंबर, २०१५ रोजी शिरगावी जाण्यासाठी तिच्या नातेवाईकांनी वैद्यकीय अधिकारी श्री. नाथा दुटे यांच्याकडे रुग्णवाहिकेची मागणी केली असता डिझेलला पैसे नसल्याचे कारण सांगून गाडी देण्यास नकार दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी महिला तीन तास रस्त्यात उन्हात तिष्ठत बसल्याने त्या महिलेची प्रकृती खालावली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत ४० हजार रुपये डिझेल करीता उपलब्ध करुन दिल्याचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी मोखाडा यांनी स्पष्टीकरण दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या विनंतीनुसार अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी या घटनेचा तपास पूर्ण केला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत रु.२५,०००/- व डी.पी.डी.सी.अंतर्गत रु.१०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

(४) व (५) अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जव्हार यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, खोडाळे येथे श्रीमती मंजुळा वाळु रण, राहणार शिरसगांव ही महिला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी तिसऱ्या खेपेस प्रसुतीसाठी दाखल होऊन प्रसुत झाली. दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी तिला पी.पी.आय.यु.सी.डी. बसविण्यासाठी प्रवृत्त करण्यासंबधाने माहिती देण्यात आली असता त्यास तिने नकार दिला त्याच दिवशी सकाळी ११.०० वा. सुमारास वैद्यकीय अधिकारी बाह्यरुग्ण विभागात तपासणी करीत असताना श्रीमती मंजुळा रण हि महिला तिच्या आजीसोबत न सांगता प्राथमिक आरोग्य केंद्रातून निघून गेली. त्यांनी रुग्णवाहिकेची मागणी केली नव्हती.

संबंधित आरोग्य सेविकेस खुलासा करणे संबंधाने नोटीस बजावण्यात आली आहे.

-----------------

## अमरावती जिल्हयातील पिंगळादेवीच्या गडावरील रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत सोडून दिल्याबाबत

**(४९) * १५४९४ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील पिंगळादेवीच्या गडावरील रस्त्याचे काही ठिकाणी डांबरीकरण करण्यात आले तर काही ठिकाणी काम अर्धवट सोडून दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी येणाऱ्या भाविकांना होणारा त्रास कमी करण्याबाबत या रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हा परिषदेमध्ये पिठ गिरणी खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(५०) * १६१३४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ११२२५ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने एका पिठ गिरणीची किंमत रुपये १३ हजार असतांना जिल्हा परिषदेने मात्र तीच गिरणी रुपये १८ हजाराला एक याप्रमाणे गेल्या तीन वर्षापासून हजारो गिरणीची खरेदी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदी प्रकरणामुळे जिल्हा परिषदेला जवळपास साडेचार कोटीचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अन्वये शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत पिठाच्या गिरणीची खरेदी ही ई-निविदाद्वारे करण्यात आली आहे.

ई निविदान्वये करण्यात आलेली खरेदी ही लघुत्तम दरास मंजूरी देते. सदर पिठाच्या गिरणीची खरेदी ही त्या त्या वर्षात लघुत्तम दरानुसार केलेली आहे. सदर किंमत ही बाजारभावाशी पडताळणी करुन जिल्हा परिषदेकडून निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जिल्हापरिषद औरंगाबाद सिंचन विभागातील गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत**

**(५१) * १४८७१ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १२४५० ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हापरिषद, औरंगाबाद सिंचन विभागात दोन वर्षामध्ये झालेल्या कोल्हापुरी बंधारे व लघु पाटबंधारेच्या कामामध्ये १३ कोटी रुपयाचा गैरव्यवहार झाल्याचे तपासणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तपासणी दरम्यान सदर कामाच्या १२३ संचिका गहाळ झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका कामाची दोन वेळेस बिले उचल केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) तपासणी दरम्यान १२३ कामांच्या निविदा संचिका उपलब्ध झाल्या नाहीत असे चौकशी अहवालात नमूद आहे.

(३) तथापि, एका कामाचे दोन वेळेस बिले उचल केल्याचे तपासणीत आढळून आलेले नाही.

(४) जिल्हापरिषदेने सर्वसाधारण सभेच्या निर्देशानुसार चौकशी समिती स्थापन करून चौकशी केली असून चौकशी अहवाल सप्टेंबर, २०१५ मध्ये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस सादर करण्यात आला. त्यामध्ये आर्थिक गैरव्यवहार आढळून आला नाही व चौकशी अहवालातील मुद्यानुसार त्रुटीस जबाबदार तत्कालिन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना नोटीस देऊन खुलासे मागविले असता त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावीत करण्यात आले आहे.

(५) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावीत करण्यात आले आहे.

-----------------

## राज्यातील दुष्काळग्रस्त भागात शेततळ्यांची कामे मंजूर करणेबाबत

**(५२) * १५९३९ श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त भागात मागेल त्याला शेततळे देण्याची घोषणा व निर्णय मराठवाड्यातील दुष्काळी आढावा बैठकीत, विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मा.मुख्यमंत्री महोदयांनी तसेच मंत्रीमंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मराठवाड्यात विशेषत: बीड जिल्हयातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी वारंवार शेततळ्यांची मागणी करूनही त्यांना शेततळ्यांची कामे मंजुर करण्यात आली नाही आणि निधी अभावी कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता शासनाने दुष्काळग्रस्त जिल्हयासाठी जिल्हा निहाय किती लक्षांक दिलेला आहे,

(४) असल्यास, दुष्काळग्रस्त भागात शेततळ्यांची कामे मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत बीड जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत शेततळे कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार बीड जिल्हयास ९८४ शेततळी मंजूर असून आतापर्यंत ४४ शेततळी पुर्ण झाली आहेत. ३६६ शेततळी प्रगतीपथावर आहेत.

बीड जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्राधान्याने शेततळ्याची कामे घेण्याबाबत सर्व तहसिलदार व गट विकास अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

(३) व (४) राज्यात मागेल त्याला शेततळे योजना, दिनांक १७/२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार अनुदान पद्धतीने राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत दिनांक २९/२/२०१६ पासून Online अर्ज करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सन २०१६-२०१७ मध्ये पहिल्या टप्प्यात राज्यात ५१,५०० शेततळ्यांचा लक्षांक देण्यात आला आहे. या योजनेसाठी निधी Drought Mitigation Measures अंतर्गत मदत व पुनर्वसन विभागाकडून उपलब्ध करुन दिला जाणार आहे. सन २०१५-२०१६ मध्ये रुपये ५० कोटी निधी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणार आहे. तर सन २०१६-२०१७ साठी रुपये २०७.५० कोटीची तरतूद करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई (जि.पालघर) पंचायत समिती क्षेत्रात विहिर बांधण्यासाठी मिळालेल्या अनुदानाच्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५३) * १७४७० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) पंचायत समिती क्षेत्रात विहिरी बांधण्यासाठी अनुदान मिळालेल्या २ कोटी ८८ लाख रुपये शासकीय रकमेचा गैरव्यवहार केल्याचे व ४१२ विहिरी हरविल्याचे लेखापरिक्षण अहवालात दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील आठ जिल्ह्यामध्ये शतकोटी वृक्ष लागवड योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(५४) * १६१६० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये दुष्काळावर मात करण्यासाठी शतकोटी वृक्ष लागवड योजना राबविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोट्यवधी रुपये देवूनही या योजनेची प्रत्यक्ष अमंलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील लातूर, बीड, उस्मानाबाद व औरंगाबाद येथे मुली व महिलांमध्ये ॲनिमीया व हिमोग्लोबिनची कमतरता दिसून आल्याबाबत**

**(५५) * १८१२० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील लातूर, बीड, उस्मानाबाद व औरंगाबाद येथे दुष्काळी परिस्थिती असल्याने अशुध्द पाणी, अपुरा आहार व पोषक आहाराचा अभाव असल्याने ८७ ते ८९ टक्के मुली व महिलांमध्ये ॲनिमीया व हिमोग्लोबिनची कमतरता दिसून आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर, २०१५ अखेर नोंदणी झालेल्या एकूण गरोदर मातांपैकी लातूर जिल्ह्यात ७७ टक्के, बीड जिल्ह्यात ६७ टक्के, उस्मानाबाद जिल्ह्यात ८१ टक्के व औरंगाबाद जिल्ह्यात ५१ टक्के गरोदर मातांमध्ये रक्तक्षय असल्याचे DHIS-२ च्या अहवालावरुन आढळून आले.

(२) रक्तक्षयाच्या प्रतिबंधासाठी व उपचारासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

सर्व गरोदर मातांची नोंदणी करुन नोंदणीसहीत किमान ५ तपासण्या करण्यात येतात व त्यांच्या रक्तातील हिमोग्लोबिनची तपासणी केली जाते. रक्तक्षय प्रतिबंधात्मक व उपचारात्मक लोहयुक्त गोळ्या दिल्या जातात. तसेच गरोदरपणात जंतनाशक गोळ्याही देण्यात येतात. तीव्र रक्तक्षय असणाऱ्या गरोदर मातांना शिरेद्वारे ईंजे.आयर्न सुक्रोज दिले जाते. गरोदर मातांना गरजेनुसार मोफत रक्त पुरवठाही करण्यात येतो. आरोग्य सेविका व आशा कार्यकर्तीमार्फत गरोदर मातांना प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात आहाराबाबत आरोग्य शिक्षणही देण्यात येते.

शाळेतील व शालाबाह्य सर्व किशोरवयीन मुलींना रक्तक्षय होऊ नये याकरीता दर सोमवारी एक लोहयुक्त गोळी देण्यात येते. जंतविकार/जंतदोषासाठी वर्षातून दोन वेळा जंतनाशक गोळ्याही देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवला तालुक्यातील (जि.नाशिक) आरोग्य संस्थाच्या पदांचा आकृतिबंध मंजूर करण्याबाबत

**(५६) * १४९७२ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक आरोग्य केंद्र, भारम तसेच उपकेंद्र, खिर्डीसाठे व भुलेगाव (ता.येवला जि.नाशिक) या नवीन मंजूर आरोग्य संस्थांची बांधकामे पूर्ण होवूनही केवळ पदांचा आकृतीबंध प्रलंबित असल्यामुळे कोटयवधी रुपयांच्या इमारती विनावापर असल्यामुळे पदांच्या आकृतीबंध मंजूर करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर २०१५ मध्ये मागणी करूनही अद्यापही सदर आरोग्य संस्था कार्यान्वित झालेल्या नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, सदर आरोग्य संस्थेचे ७५ टक्के बांधकाम पूर्ण झालेले असून आकृतीबंधानुसार पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.
(२) आकृतीबंधानुसार पदनिर्मितीची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कळवण तालुक्यातील (जि.नाशिक) बालगृहे बंद पडण्याच्या स्थितीत असल्याबाबत**

**(५७) * १८२३० श्री.नागो गाणार :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण तालुक्यातील (जि.नाशिक) सुमारे दोन हजार अनाथ निराधार बालकांचे भोजन अनुदान आणि कर्मचाऱ्यांचे वेतन बंद झाले असून बालकांना सांभाळणारी बालगृहे बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालकल्याण समिती (बाल न्यायालय) कडून सुमारे १८०० ते २००० बालके वास्तव्य करीत असून बालकांना सांभाळणाऱ्या २०० कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बालकांचे तुटपुंजे अनुदानही गेली तीन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, नाशिक जिल्ह्यामध्ये एकूण २३ स्वयंसेवा संस्था असून यापैकी कळवण तालुक्यात ५ स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. सदर संस्थांना शासनाकडून परिपोषण अनुदान व इतर प्रशासकीय खर्चासाठी सहाय्यक अनुदान देय आहे. यासाठी विभागास उपलब्ध होणाऱ्या तरतूदीतून संबंधित संस्थांना अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

या संस्थांतील नाशिक जिल्हयात मंजूर लाभार्थी संख्या १९७० असून कळवण तालुक्यातील लाभार्थ्यांची संख्या ३४५ एवढी आहे. यापैकी सरासरी उपस्थिती नाशिक जिल्हा व कळवण तालुक्यात अनुक्रमे १५९५ व २५६ इतकी आहे.

बालगृहातील कर्मचाऱ्यांना शासनामार्फत वेतन / मानधन देण्यात येत नाही. तथापि बालगृहांना इतर प्रशासकीय खर्च (व्यवस्थापन अनुदान) देण्यात येतो.

(३) सन २०१४-१५ मध्ये उपरोक्त संस्थांना रु. ५५.६१ लक्ष तर सन २०१५-१६ मध्ये रु.३३.१२ लक्ष एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(४) राज्यातील बालगृहांना सहाय्यक अनुदान उपलब्ध होण्यासाठी रु. १५६.४४ कोटी इतक्या रक्कमेचा पुरवणी मागणी प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला होता, तथापि तो मंजूर होऊ शकला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाच्या**
**शिफारशीनुसार विशेष निधी सुरु करण्याबाबत**

**(५८) * १६९८९ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २८२२ ला दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाच्या शिफारशीनुसार विशेष निधी पुन्हा सुरु करण्यासंदर्भातील व्यवहार्यता व परिणामकता तपासण्याकरिता दिनांक १० डिसेंबर, २०१५ च्या आदेशान्वये उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा प्रकरणाधीन अहवाल शासनास केव्हा सादर करण्यात येणार आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) त्याचप्रमाणे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात दिनांक ४ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या शासन आदेशान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीपैकी किती निधी उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाकरिता उपलब्ध करण्यात आला व त्यामधून किती निधी कोंकण विभागासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(४) तसेच कोंकण प्रदेश विभागासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या एकूण निधी मधून कोणकोणती कामे करण्यात आली व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) विशेष निधी सुरु करणे गरजेचे आहे किंवा कसे याबाबतची व्यवहार्यता व परिणामकता तपासण्याकरिता शासन निर्णय दिनांक १० डिसेंबर, २०१५ अन्वये अपर मुख्य सचिव (नियोजन), अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (कृषी) व प्रधान सचिव (जलसंपदा) यांची समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीने अद्याप आपला अहवाल शासनास सादर केलेला नाही.

(३) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळास उपलब्ध करुन दिलेल्या रु. ६९२.९७ लक्ष निधीपैकी रु. २८०.६३ लक्ष इतका निधी कोकण विभागासाठी उपलब्ध करुन देण्यात आला होता.

(४) कामांची यादी खालीलप्रमाणे :-

**सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात विशेष निधींतर्गत कोकण प्रदेश विभागास उपलब्ध करून दिलेल्या निधीमधून हाती घेण्यात आलेल्या कामांचा तपशिल**

| अ. क्र. | कामाचे नाव | सद्यस्थिती |
|---|---|---|
| **सिंधुदुर्ग** | | |
| १. | कसवण बौधवाडी येथे स्मशानभूमी शेड व निवारा शेड बांधणे ता. कणकवली | काम पूर्ण |
| २. | बुरंबावडे सिद्धेश्वरवाडी येथे बोअरवेलवरून लघु नळ पाणीपुरवठा योजना करणे ता. देवगड | काम पूर्ण |
| **रत्नागिरी** | | |
| ३. | मौजे बापेरे झोरेवाडी येथे सिमेंट बंधारा बांधणे, ता. लांजा | ७०% टक्के काम पूर्ण उर्वरित काम प्रगतीत |
| ४. | मौजे माथेगुजर गावठाणवाडी येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे ता. दापोली | पाईप पुरवठा पूर्ण उर्वरित काम प्रगतीत |

| | | |
|---|---|---|
| **रायगड** | | |
| ५. | रामराज कोळीवाडा स्मशानभूमीवर पाण्याच्या टाकीची व्यवस्था करणे ता. अलिबाग | काम पूर्ण |
| ६. | जावळी हायस्कूल परिसरात नळ पाणीपुरवठा योजना करणे ता. माणगाव | काम पूर्ण |
| ७. | मौजे आंबवडे खिंडवाडी नळ पाणीपुरवठा योजना विस्तारीकरण करणे, ता. महाड | काम पूर्ण |
| ८. | मौजे नानेघोळ येथे स्मशानभूमी बांधणे, ता. पोलादपूर | संरक्षक भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम १५ दिवसात पूर्ण करून घेण्यात येत आहे. |
| **ठाणे** | | |
| ९. | गाळे पाटीलपाडा येथे पिण्याच्या पाण्याची विहिर बांधणे, ता. वाडा | निविदा स्तरावर आहे. |
| १०. | बोंडेशेत (मेर्दी) येथील के.टी. बंधाऱ्यालगत संरक्षक भिंत बांधणे, ता. मुरबाड | काम पूर्ण |
| ११. | रिकामवाडी (ढाढारे) या आदिवासी वस्तीत विहिर खोदणे, ता. शहापूर | अंतिम टप्प्यात |
| १२. | खंडूचीवाडी (वेहकोळी बु.) या आदिवासी वस्तीत विहिर, ता. शहापूर | अंतिम टप्प्यात |
| १३. | कृष्णाची वाडी वेहकोळी बु. या आदिवासी वस्तीसाठी विहिर, ता. शहापूर | अंतिम टप्प्यात |
| १४. | अंबर्जे येथे आदिवासी कातकरी वस्तीसाठी विहिर, ता. शहापूर | अंतिम टप्प्यात |
| १५. | भांगवाडी (माळ) येथील आदिवासींसाठी तेल मशीनसाठी जनरेटर, ता. मुरबाड | काम पूर्ण |
| १६. | मोरोशी या आदिवासी वस्तीतील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी साहित्य, ता. मुरबाड | काम पूर्ण |
| १७. | शिसेवाडी-डोंगरवाडी येथे नळ पाणी योजनेच्या टाक्या बसविणे, ता. मुरबाड | अंतिम टप्प्यात |

| | | |
|---|---|---|
| १८. | आदिवासी वस्ती शिसेवाडी येथील ग्रामस्थांना मासेमारीसाठी साहित्य, ता. मुरबाड | काम पूर्ण |
| १९. | न्याहाडीपाडा-कातकरीवाडी येथील कातकऱ्यांना मासेमारीसाठी साहित्य, ता. मुरबाड | काम पूर्ण |
| २०. | वाकळवाडी (खुटल) येथील वाहून गेलेला बंधारा पुन्हा बांधणे, ता. मुरबाड | काम पूर्ण |
| २१. | मुरबाड तालुक्यातील म्हसा केंद्रामधील जिल्हा परिषद शाळा पाटगाव, म्हसा व काव्होक येथील इ. ५वी ते ७ वी च्या विद्यार्थीनींसाठी सायकल पुरविणे | काम पूर्ण |
| **मुंबई उपनगर** | | |
| २२. | एल.बी.एस मार्ग, भांडूप पश्चिम येथील हिंदू स्मशानभूमीसाठी टॉयलेट ब्लॉक बांधणे | सदर १० कामांची निविदा प्रक्रिया सुरू. |
| २३. | एल. बी. एस. मार्ग भांडूप पश्चिम येथील गुजराती स्मशानभूमीचे सुशोभिकरण करणे | |
| २४. | एल. बी. एस. मार्ग भांडूप पश्चिम येथील गुजराती स्मशानभूमीसाठी पाण्याची लाईन टाकणे | |
| २५. | कसाईवाडा, कुर्ला येथे हिंदू स्मशानभूमीसाठी शेड बांधणे | |
| २६. | इंदिरानगर मंडळ येथे महिलांसाठी टॉयलेट ब्लॉक बांधणे | |
| २७. | इंदिरानगर मंडळ येथे महिलांसाठी टॉयलेट ब्लॉक बांधणे | |
| २८. | प्लॉट नं. ४४, शिवाजीनगर गोवंडी येथे टॉयलेट ब्लॉक | |
| २९. | मुस्लिम स्मशानभूमी गोवंडी येथे पाण्याची लाईन टाकणे | |

| | | |
|---|---|---|
| ३०. | प्लॉट नं. ३४, रोड नं. १२, गोवंडी येथे महिलांसाठी टॉयलेट ब्लॉक बांधणे | |
| ३१. | प्लॉट नं. ३४, रोड नं.१२, गोवंडी येथे टॉयलेट ब्लॉक बांधणे | |

-----------------

**तलासरी तालुक्यात (जि.पालघर) इंदिरा आवास योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या घरकुल योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५९) * १५८२१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी तालुक्यात (जि.पालघर) इंदिरा आवास योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या घरकुल योजनेत गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलासरी तालुक्यातील आमगाव/अच्छाड ग्रुप ग्रामपंचायतीत सन २०११-१२ मध्ये १८६ लाभार्थ्यांना शासनाच्या निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या घरकुलांची कामे मार्च, २०१२ आधी पूर्ण करण्याचे बंधन असतानाही चार वर्षे उलटूनही अपूर्ण स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना घरकुले उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) नाही.

तथापि, तलासरी तालुक्यातील आमगाव/अच्छाड ग्रुप ग्रामपंचायतीत सन २०११-१२ मध्ये घरकुले मंजूर झालेली नसून सन २०१२-१३ मध्ये १८६ घरकुले मंजूर झालेली आहेत. इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार घरकुलांचे बांधकाम पहिला हप्ता मंजूर झाल्यापासून २ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये मंजूरी दिलेल्या घरकुलांचे बांधकाम माहे मार्च, २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. लाभार्थ्यांनीच घरकुलाचे बांधकाम उशिरा सुरु केल्याने १२ घरकुले अपूर्णावस्थेत आहे.

(३) होय.

(४) सदर १८६ घरकुलांपैकी १७४ घरकुले पूर्ण आहेत. अपूर्ण १२ घरकुलाचे बांधकाम उशिरा सुरु केल्याने बांधकाम अपूर्णावस्थेत आहे. सदरच्या १२ लाभार्थ्यांना मार्च, २०१६ पूर्वी घरकुले पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोठारी (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) गावातील फुले-आंबेडकर सांस्कृतिक भवनाची दूरवस्था दूर करण्याबाबत**

**(६०) * १५६९८ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोठारी (ता. बल्लारपूर जि.चंद्रपूर) गावामध्ये ८ लाख रुपये खर्च करुन बांधलेले फुले-आंबेडकर सांस्कृतिक भवनाची स्थानिक ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून ग्रामपंचायतीने सांस्कृतिक भवनाचे दुरुस्तीचे कामा करीता रु. २५,०००/- चे अंदाजपत्रक सामान्य फंडातून तयार करुन सांस्कृतिक भवनाची डागडुजी, दारे, खिडक्या वा रंगरंगोटी इत्यादी कामे करण्यात आल्याचे आढळून आले आहे. सदर कामावर रु. २५,०००/- खर्च झालेला आहे.

(४) अशी बाब नाही.

-----------------

**मौ.गोळेगाव (प.क.) (ता.लोहा, जि.नांदेड) येथे सामाजिक वनीकरण कामाच्या हजेरीपत्रकावर बालके व अपंगांची नावे असल्याबाबत**

**(६१) * १५०६९ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.गोळेगाव (प.क.) (ता.लोहा, जि.नांदेड) येथे सामाजिक वनीकरण विभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाच्या हजेरीपत्रकावर लहान बालके व अपंग व्यक्तिंची बोगस नावे असल्याचे व लागवड अधिकाऱ्याने दोन लहान बालकांची नावे हजेरीपत्रकावर घातल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ व अकोला जिल्हयात जलशिवार योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(६२) * १४८२२ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जलयुक्त शिवार योजनेत गैरव्यवहार झाला या तक्रारीची चौकशी करण्याच्या सूचना डी.पी.डी.सी. (जिल्हा नियोजन समिती) च्या बैठकीमध्ये करण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) शासनाने शेतकऱ्यांसाठी करोडो रुपये खर्च करून जलयुक्त शिवार अभियान कोरडवाहू योजना सुरु केली असून यवतमाळ जिल्हयात व पातूर (जि.अकोला) तालुक्यात कृषि विभागाच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या कामात गैरव्यवहार झाला असून या सर्व कामांची चौकशी करण्याबाबत पंचायत समितीच्या मासिक सभेत ठराव करण्यात आला असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार योजनेतील ज्या कामात गैरप्रकार झाला असेल याबाबत लेखी माहिती द्यावी जेणेकरुन सदर कामांची स्वतंत्र पथकाकडून चौकशी करता येईल अशा सूचना जिल्हा नियोजन समितीच्या अध्यक्षांनी जिल्हा वार्षिक सभेत दिल्या आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

पातूर (जि.अकोला) तालुक्यात दिनांक ७/९/२०१५ रोजी पंचायत समिती पातूर येथिल सभेत तालुका कृषी अधिकारी, पातूर हे सभेस गैरहजर राहत असून सभागृहात माहिती सादर करत नाहीत असा आक्षेप नोंदविण्यात आला असून ठराव क्र.३ नुसार अध्यक्ष तथा सभापती पंचायत समिती पातूर यांनी त्यांचे समक्ष कामाची चौकशी करणेबाबत ठराव घेतला आहे. यवतमाळ जिल्ह्यात अशा प्रकारचा ठराव घेण्यात आलेला नाही.

(३) नाही.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अकोला यांनी तालुका कृषी अधिकारी यांना शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती पंचायत समिती सदस्यांना लेखी स्वरुपात पुरविण्यात यावी तसेच यापुढे सभेस हजर राहून योजनांची माहिती द्यावी व भविष्यात अशा प्रकारची तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी असे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोर्लीपंचतन (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देणेबाबत**

**(६३) * १४९१८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर्लीपंचतन (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथे रायगड जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र गेल्या ५० वर्षांपासून कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढती लोकसंख्या, परिसरात वाढलेल्या पर्यटकांची संख्या व दिघी पोर्टचा विस्तार याचा विचार करता येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही. बोर्लीपंचतन (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सन १९८९ पासून कार्यरत आहे.

(२) बोर्लीपंचतन येथील ग्रामस्थांनी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागी ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याबाबत मागणी तत्कालीन मा.मंत्री, जलसंपदा तथा पालकमंत्री यांना केलेली होती. तत्कालीन मा.मंत्री, जलसंपदा तथा पालकमंत्री, रायगड यांनी बोर्लीपंचतन येथील ग्रामस्थांच्या विनंतीच्या अनुषंगाने त्यांचे निवेदनावर योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

(३) सन २००१ च्या लोकसंख्या व इतर भौगोलिक निकषांवर आधारीत आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्यास दिनांक १७.१.२०१३ व दिनांक ९.६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये बोर्लीपंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या श्रेणीवर्धनाचा समावेश नाही. बृहत आराखडा मंजूरीनंतर आरोग्य संस्था स्थापनेसाठी/श्रेणीवर्धनासाठी लोकप्रतिनिधींकडून शासनास प्राप्त झालेल्या मागण्यांच्या संदर्भातील धोरणात्मक निर्णय अद्याप घेण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयाच्या विकास आराखडयास निधी उपलब्ध करण्याबाबत

**(६४) * १५५५६ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील ठाणे जिल्हयाच्या ४४५ कोटींच्या विकास आराखड्यास मा.पालकमंत्री यांच्या उपस्थितीत जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) बैठकीत मंजूरी मिळाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास निधी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी शासनाने कळविलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता रु.२६५.७४ कोटी, आदिवासी उप योजना क्षेत्र (TSP) करीता रु.९१.२३ कोटी, आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील (OTSP) करीता रु.२५.२१ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना (SCP) करीता रु.६२.८७ कोटी याप्रमाणे एकूण रु.४४५.०५ कोटी रक्कमेच्या आराखड्यास जिल्हा नियोजन समिती, जि.ठाणे ने दिनांक ७/१/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत मंजूरी दिली आहे.

दिनांक १/३/२०१६ रोजी ठाणे जिल्ह्याचा जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१६-१७ करीताचा प्रारुप आराखडा अंतिम करण्यासंदर्भात मा.मंत्री (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठक झाली असून सद्य:स्थितीत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), सन २०१६-१७ जि.ठाणे साठी एकूण रुपये २६६.८७ कोटी रक्कमेचा अंतिम नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता ठाणे जिल्ह्यासाठी सदर नियतव्ययासह अदिवासी उप योजना क्षेत्र (TSP) करीता रु.९१.२३ कोटी, आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील (OTSP) करीता रुपये २५.२१ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना (SCP) करीता रु.६२.८७ कोटी याप्रमाणे एकूा रु.४४६.१८ कोटी रक्कमेचा अंतिम नियतव्यय सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानमंडळाच्या मंजूरीसाठी प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयातील ऊसाची पिके पाण्यावाचून करपून गेल्याबाबत**

**(६५) * १५५३९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सीना-माढा उपसा सिंचन योजना, कालवा, भीमा सीना जोड कालवा, भीमा काठ, सीना काठ यावरील ऊस पिके पाण्यावाचून करपून गेली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊस जळून जात असल्यामुळे ऊसाचे वजन घटून उत्पन्नात घट झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पाण्याचा व शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१५ मधील सोलापूर जिल्यातील पर्जन्यमान सरासरीच्या एकूण ५३% झाले आहे. तसेच उजनी जलाशयात पाणीसाठा न झाल्याने पाण्याअभावी ऊस वाढीवर व उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

ऊस पिक कापणी प्रयोग खरीप हंगाम सन २०१५-१६ मधील निष्कर्षानुसार सरासरी २० टक्के उत्पादनात घट झाली आहे.

(३) ऑक्टोबर २०१५ अखेर पर्यंत उजनी धरणात पुरेसा पाणीसाठा झाला नसल्याने सिंचनासाठी पाणी सोडण्यात आलेले नाही. सदर बाब ही नैसर्गिक आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मनमाड (जि.नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या महिलेची पैशासाठी अडवणूक केल्याबाबत

**(६६) * १७१५१ श्री.अमरिशभाई पटेल, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (जि.नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या गोपाळवाडी (ता.येवला) येथील एक गरीब महिलेची डॉक्टरांनी पैशासाठी अडवणूक केल्याची घटना घडली असून या डॉक्टरवर कारवाई करण्याची मागणी आरोग्य समितीचे सदस्य यांनी केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित डॉक्टरवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

डॉक्टरांनी गरीब महिलेची पैशासाठी अडवणूक केली नसून या कथित घटनेबाबत संबंधित डॉक्टरवर कारवाई करण्याची मागणी आरोग्य समितीच्या सदस्यांनी केल्याचे आढळून आले नाही. परंतु या अनुषंगाने दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात दिनांक २.९.२०१५ रोजी बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीच्या अनुषंगाने निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क) यांनी चौकशी केली असून सदर चौकशीत महिलेची डॉक्टरांनी पैशासाठी अडवणूक केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत**

**(६७) * १७३८९ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात दिनांक १ मे, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत जलयुक्त शिवार योजनेची किती कामे हाती घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील कळंब, राळेगाव इत्यादी भागात लोकप्रतिनिधीच्या हस्ते उद्घाटन करुन कोणतेच काम सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित असलेली कामे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत यवतमाळ जिल्ह्यात १ मे, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत १०१० उपचाराची कामे करण्यात आली आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

मौजा अंतरगाव ता.राळेगाव व मौजा कळंब ता.कळंब येथील कामांचे उद्‌घाटन करण्यात आले आहे. तथापि, राळेगाव तालुक्यात कोणतेच काम दि. १ मे, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ करण्यात आलेले नाही. राळेगाव तालुक्यात मार्च, २०१५ अखेर ४ सिमेंट नाला बांध, ४ ढाळीचे बांध व १ नाला खोलीकरण इ.कामे पूर्ण करण्यात आली असून ४९ कामांचे पुढील कालावधीत निविदा प्रक्रीया पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

मौजा कळंब, ता.कळंब येथे दिनांक १ मे, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ अखेर १३ जुन्या सिमेंट नाला बांधाचे खोलीकरण पूर्व करण्यात आले असून ५४ कामांचे पुढील कालावधीत निविदा प्रक्रिया पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वनपालांना वनक्षेत्रपाल म्हणून पदोन्नती देण्याबाबत

**(६८) * १८६२४ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिविक्षाधीन वन परिक्षेत्र अधिकारी यांना क्षेत्रिय प्रशिक्षण प्राप्त न करताच वनक्षेत्रपाल म्हणून दिलेल्या पदोन्नतीमुळे सदरपदाच्या पदोन्नतीस पात्र असलेल्या वनपालांना या पदोन्नती पासून वंचित राहावे लागणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महाराष्ट्र राज्य फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन मधील महासंघाने मा.वने मंत्री यांना दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

वनपाल संवर्गातून वनक्षेत्रपाल संवर्गातील पदोन्नतीची पदे पूर्णपणे भरण्यात आलेली आहेत.

(२) खरे आहे.

(३) एफ.डी.सी.एम.लिमिटेड मधील परिविक्षाधीन वनक्षेत्रपाल यांना वनक्षेत्रपाल या पदावर पदस्थापना अद्‌याप करण्यात आली नाही. तथापि, वनपाल संवर्गातून वनक्षेत्रपाल संवर्गातील पदोन्नतीची पदे पूर्णपणे भरण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

--------------------------------

**राधानगरी (ता.जि.कोल्हापूर) येथील तुळशी प्रकल्पाच्या काठावर वसलेल्या गावांतील लोकांना तराफावरुन प्रवास करावा लागत असल्याबाबत**

**(६९) * १५५०२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (ता.जि.कोल्हापूर) येथील तुळशी प्रकल्पाच्या काठावर वसलेल्या मोहितेवाडी, खामकरवाडी ग्रामस्थांचा तराफ्यावरचा धोकादायक प्रवास अजूनही सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव या वसाहतीतील ग्रामस्थांना रस्ता, दवाखाना, शिक्षण, एसटी सुविधा अभावी अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लहान मुलांना शिक्षणासाठी लाकडी तराफ्यातून प्रवास करावा लागत असल्याने मुलांचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) संबंधित ग्रामपंचायतींना तराफ्यातून धोकादायकरित्या वाहतूक करण्यास मनाई असल्याबाबत जिल्हापरिषदेकडून सूचना केलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयात तुटीच्या क्षेत्रास अतिरिक्त पाणी उपलब्ध करण्याबाबत

**(७०) * १८३३५ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैतरणा या दक्षिणवाहिनी नदीचे ठाणे जिल्हयातुन समुद्राला जाऊन मिळणारे पाणी व पिंजाळ तसेच गारगाई या उपनद्यांचे, उपखोऱ्यात उपलब्ध असलेले ५ टी.एम.सी. पाणी नाशिक जिल्हयाला उपलब्ध करून देणेचे अनुषंगाने राष्ट्रीय जलविकास प्राधिकरणाच्या (एन.डब्ल्यु.डी.ए.) अधिकाऱ्यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नाशिक येथे मेरी या संस्थेस भेट देऊन पाहणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) असल्यास, नाशिक जिल्हयात तुटीच्या क्षेत्रास अतिरिक्त पाणी उपलब्ध व्हावे, या अनुषंगाने प्रस्तुत लिंक योजना व अन्य पश्चिमवाहिनी नद्यांवरील वळण योजनांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

नियोजन व जलविज्ञान, नाशिक कार्यालयाकडे अधिशासी अभियंता (Executive Engineer) राष्ट्रीय जलविकास प्राधिकरण, नाशिक यांनी वैतरणा-गोदावरी (मुकणे/दारणा) या जोड प्रकल्पाच्या Revised Prefeasibility Report साठी पर्जन्यमापक केंद्राच्या आधारसामग्रीची मागणी दिनांक ६/१/२०१६ रोजी केली आहे.

वरील आधारसामग्रीच्या मागणी संदर्भामध्ये राष्ट्रीय जलविकास प्राधिकरण, नाशिक येथील अधिकारी दिनांक ७/१/२०१६ रोजी नियोजन व जलविज्ञान कार्यालयामध्ये चर्चेसाठी उपस्थित होते. सदर माहिती उपलब्ध करून देण्याची कार्यवाही नियोजन व जलविज्ञान कार्यालया अंतर्गत कार्यकारी अभियंता, जलहवामान आधार सामग्री प्रक्रिया विभाग नाशिक यांचेमार्फत सुरु आहे.

(३) वैतरणा-गोदावरी (मुकणे/दारणा) या जोड प्रकल्पाच्या Revised Prefeasibility Report तयार करण्याबाबतची विनंती शासनाने राष्ट्रीय जल विकास अभिकरण, नवी दिल्ली यांचेकडे दिनांक २० एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये केली आहे. त्याचप्रमाणे सदरहू योजनेबाबतची शेरे पूर्तता व अतिरिक्त माहिती

राष्ट्रीय जल विकास अभिकरण, नवी दिल्ली यांचेकडे दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी पाठविण्यात आलेली आहे.

दमणगंगा (एकदरे) ते गोदावरी खोरे या राज्यांतर्गत नदी जोड प्रकलपाच्या व्यवहार्यता अहवालानुसार गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी उपलब्ध होणारे पाणी १४३ दलघमी (५.०५ अघफु) आहे या योजनेचा व्यवहार्यता अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणास तयार केलेला असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेबाबतची विनंती राज्य शासनाने दिनांक १२/३/२०१५ रोजी राष्ट्रीय जलविकास अभिकरणास केलेली आहे.

तसेच पश्चिम वाहीनी नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्यादृष्टीने वळण योजनांची कामे विविध टप्प्यावर प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोजगार हमी योजनेतून मंजूर झालेल्या विहीरीचे काम करणाऱ्या मजुरांना केवळ दोन मस्टरचे पैसे अदा करण्यात आल्याबाबत

**(७१) * १६५९३ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री वासुदेव नामदेव इंगळे हे अपंग असून त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पंचायत समिती, शेगांव मार्फत विहीर मंजूर झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी मजुरांचे जॉब कार्ड ग्रामसेवकाने तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्याच्या विहीरीचे एकूण ३६ फुट खोल खोदकाम झाले असून त्याबाबत त्या मजूरांना केवळ दोनच मस्टरचे पैसे अदा करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२) होय,

(३) हे खरे नाही. सदर सिचंन विहिरीसाठी एकूण १५ मस्टर काढलेले असून अकुशल रक्कम रुपये ८३७०६/- मजुरांना अदा करण्यात आली आहे.
(४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेगांव यांनी चौकशी केली असता, कामाचे मुल्यांकनानुसार सर्व रक्कम अदा केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पंतप्रधान ग्रामसडक योजनेची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(७२) * १६६९४ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील टाकीपठार, आपटे खरीड, कानवे ते मूगाव या १०.१७५ किमीच्या अंतराला पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूरी देण्यात आली असून सदरहू एमडीआर ६३ या रस्त्यांसाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास यंत्रणेकडून ५० कोटी २ लाख ८ हजार ७२१ रूपयांचे अर्थसहाय्य मिळाले असून ५ वर्षे दुरूस्ती देखभालीसाठी ५ कोटी ३ लाख २३ हजार १३७ रूपये इतका निधी प्राप्त झाला असून दिनांक २८ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास सदर रस्त्यांचे काम सुरू झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांचे मातीकाम (३६७४६ मी) जीएसबी (५०३.१५ मी) खडीकरण (ग्रेड २'४४६३१ मी) डांबरीकरण, कारपेट, सीलकोटसह (३२२२५ मी) कॉंक्रीटीकरण (१८५० मी) व एकूण १५ मोठया असे कामांचे स्वरूप असलेला हा रस्ता ठाणे येथील आर्वी कॉन्ट्रॅक्ट कंपनीला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठेकेदारांच्या व अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत सुरू असलेले सदर काम प्रलंबित असून खडी उखडून वर आल्याने गाडयांना अपघात होणे व प्रवाशांना मणक्यांचे त्रास सुरु झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामस्थांनी गत १ वर्षापासून उप अभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना, ठाणे परिसर, कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद सार्वजनिक बांधकाम विभाग, मा. ग्रामविकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

तथापि, प्रश्नांकित कामाची निविदा किंमत रु. ५ कोटी २८ हजार असून ५ वर्षाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रु.५३,२३,१२७/- एवढी रक्कम मंजूर आहे.

(२) सदर रस्त्याचे काम मे.आर.व्ही.कन्स्ट्रक्शन कंपनी, ठाणे यांना दिले आहे.

(३) केंद्र शासनाकडून राज्यास मंजूर कार्यक्रमाच्या प्रमाणात अत्यल्प निधी प्राप्त झाल्यामुळे योजनेतील कामांच्या गतीवर परिणाम झाला आहे.

(४) प्रश्नांकित रस्त्याची खडी उखडल्याची तक्रार दि.२५ जानेवारी, २०१६ रोजी प्राप्त झाली आहे. तद्नंतर सदर रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून सदर कामाकरीता आद्यापपर्यंत रु.२३३.२३ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

(५) व (६) राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी सदर काम समाधानकारक अभिप्राय दिले असून पावसाळ्यापूर्वी सदर काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## राज्यातील बालसुधारगृहाच्या सुरक्षेबाबत

**(७३) * १६९५४ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध संघर्षग्रस्त मुले व बालसुधारगृहातील बालके पळून जाण्याच्या घटना वाढत असल्याने बालसुधारगृहाच्या सुरक्षेबाबत प्रश्न निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालसुधारगृहाच्या सुरक्षेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

महिला व बाल विकास विभागांतर्गत असलेल्या राज्यातील बाल सुधारगृहे (निरीक्षणगृहे) यातील बालके पळून जाण्याची घटना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडलेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणातील तिलारी पाटबंधारे प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्यातील पिचींगची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(७४) * १७०३३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील तिलारी पाटबंधारे प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्यातील पिचींगची कामे निकृष्ट दर्जाची झालेली आहेत त्यामुळे कालव्याला विवरे पडू लागल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकृष्ट कामांची चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) पिचींगची कामे निकृष्ट दर्जाची झाल्यामुळे कालव्याला विवरे पडू लागली आहेत हे खरे नाही. तथापि तिलारी डावा कालवा व उजवा कालव्याची मातीकामे व बांधकामे पूर्ण होऊन बराच कालावधी उलटला आहे. डाव्या कालव्यावरील सा.क्र.८/८१५, ८/३५०, ७/५२० व उजवा कालावा सा.क्र. १७/६६० मी. येथील नलिका मोरीला पाईपच्या जॉईंटमधील गळतीमुळे पाईपींग होऊन विवर सद्दश खड्डे निर्माण झाले होते. सदर ठिकाणी तातडीने आवश्यक दुरुस्ती करण्यात आली असून कालव्यातून पाणी प्रवाह सुरळीत करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील लघु पाटबंधारे योजना व कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे खडकपूर्णा प्रकल्पाचा भाग म्हणून समावेश करण्याबाबत

**(७५) * १७२०० डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील खडकपुर्णा प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील लघु पाटबंधारे योजना व कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे खडकपूर्णा प्रकल्पाचा भाग म्हणून समावेश करुन घेणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्रावर निर्णय घेऊन सदर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील लघू पाटबंधारे योजना व कोल्हापूर पध्दतीचे बंधारे या प्रकल्पाचा भाग म्हणून समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.मंत्री जलसंपदा महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०३.०२.२०१६ रोजी मंत्रालय मुंबई येथे संबंधित लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेतलेली आहे. सदर बैठकीत लोकप्रतिनिधीच्या सिंचनाच्या मागण्याचा विचार करता, जलनियोजनाचा सुक्ष्म सिंचनाचा समावेश करुन फेर नियोजन करता येईल काय याबाबत तपासण्याच्या सुचना मा.मंत्री (जलसंपदा) यांनी दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या अहवालामुळे ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत

**(७६) * १७३५२ श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनला लागून वाहणाऱ्या हुमन नदी (अंधारी) वर सिंदेवाही तालुक्यातील सिरकाडा गावालगत सिंचनाखाली येणार आहे तसेच परिसरातील १५ तलाव पाण्याने पूर्ण भरलेले रहाणार असल्याने पाण्यासाठी वाघ जंगलाच्या बाहेर पडणार नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या अहवालामुळे हा प्रकल्प बंद पडण्याच्या मार्गावर असून यावर तज्ञ मंडळीची समिती गठीत करुन सकारात्मक मार्ग काढल्यास हा प्रकल्प पूर्ण होऊ शकतो यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही, तथापि, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनला लागून वाहणाऱ्या हुमन नदी (अंधारी) वर सिंदेवाही तालुक्यातील सिरकाडा गावालगत हुमन नदी प्रकल्प प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पात १९२५.५५ हेक्टर वनक्षेत्र बाधित होणार असून सदर जमिन वळतीकरणास केंद्र शासनाने दिनांक ०३.०२.२००४ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: मान्यता प्रदान केली आहे.

राज्य शासनाने दिनांक ०५.०५.२०१० रोजी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोर क्षेत्राभोवतीचे क्षेत्र हे बफर झोन म्हणून अधिसूचित केल्यामुळे हुमन नदी प्रकल्पातील बाधित १९२५.५५ हेक्टर क्षेत्रापैकी ९६७.३७ हेक्टर क्षेत्र हे बफर झोन क्षेत्रामध्ये अंतर्भूत झाले आहे.

(२) व (३) केंद्र शासनाने दिनांक १९.०८.२०१४ रोजीच्या पत्रान्वये Human River Irrigation Project Vis-a-Vis the identified tiger corridor linkage साठी समिती गठीत केली असून सदर समितीने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन त्यांचा अहवाल राष्ट्रीय व्यार्घ संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांना सादर केला आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवध्रन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी सदर समितीने सूचविलेल्या पर्यायांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन अहवाल सादर करण्यास दिनांक ०३.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास कळविले आहे.

समितीने सुचविलेल्या पर्यायांच्या अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेचे अभिप्राय प्राप्त करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्यास अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना शासनपत्र दिनांक २१.०१.२०१६ अन्वये कळविण्यात आले आहे.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मृदसंधारणाच्या कामात झालेली अनियमितता

**(७७) * १७४४३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मृदसंधारण उपयोजनेद्वारे करावयाच्या ११४ कोटी रुपयांच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील प्रत्येक गावात या अंतर्गत देण्यात यावयाच्या कामात ई-टेंडर प्रणाली वगळून रुपये ३ लाखांच्या आतील अंदाजपत्रकांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत कंपार्टमेंट बंडीग, शेततळे, माती बांधकाम इ. कामे बोगस व अर्धवट अवस्थेत झालेली असतानाही त्यांची देयके अदा करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या कामांची चौकशी करण्याचे आदेश उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना अहमदनगर यांनी दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, कृषि विभागाकडील कामे ही संख्येने मोठ्या प्रमाणावर असून ती लहान स्वरुपाची व कमी अंदाजपत्रकीय रकमेची असतात. त्यामुळे सदर कामांची अंदाजपत्रकीय रक्कम ही रु. ३ लाख पेक्षा कमी रकमेची होती व त्यानुसारच प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

(३) हे खरे नाही.

कामे भौतिक व तांत्रिकदृष्ट्या पूर्ण झालेनंतरच कामाची देयके अदा करण्यात आली आहेत. यामध्ये संबंधित ग्रामसभेत वेळोवेळी माहिती देणे तसेच G.P.S. वर कामांची प्रगतीनुसार काम सुरु करण्यापूर्वी व कामे पूर्ण झाल्यावर फोटो टाकण्याची कार्यवाही केली आहे. संबंधित गावांच्या ग्रामसभेमधून कामांच्या बाबतीत समाधान व्यक्त केलेले असून सदर कामांची यशोगाथाही तयार केलेल्या आहे.

(४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अहमदनगर यांचेकडून तक्रारी संबंधी चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पूर्व विदर्भातील मालगुजारी तलाव दुरुस्त करण्याबाबत

**(७८) * १७७४९ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती शोभाताई फडणवीस : तारांकित प्रश्न क्रमांक १११०९ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पूर्व विदर्भातील जलसंकट दूर करण्यासाठी नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील मालगुजारी तलाव दुरुस्त करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी शासनाने किती रकमेची तरतूद केली आहे तसेच तलावाच्या पुनरुज्जीवनाचा आराखडा शासनाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) असल्यास, मालगुजारी तलावाच्या पुनरुज्जीवनाचे काम किती कालावधीत पूर्ण होईल,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. हे खरे आहे.
(२), (३) व (४) ० ते १०० हे.सिं. क्षमतेच्या माजी मालगुजारी तलावांचे विशेष दुरुस्तीकरिता माजी मालगुजारी तलावांच्या विशेष दुरुस्ती संदर्भातील मापदंड सुधारण्यात आले आहेत. मापदंडात बसणाऱ्या तलावांची संख्या व लागणारा निधी ई.माहिती एकत्रित करण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडून सुरू आहे.

सन २०१६-२०१७ ते २०१८-२०१९ या ३ वर्षाच्या कालावधीमध्ये विदर्भातील मा.मा.तलावांची सर्वंकष दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दारेफळ (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील स्त्री रुग्णालयात कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेदरम्यान सुई पोटात राहिल्याबाबत**

**(७९) * १७८५८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारेफळ (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील स्त्री रुग्णालयात साबेराबी शेख चांदसाब या महिलेच्या करण्यात आलेल्या कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेदरम्यान टाके मारण्याची सुई पोटात राहिल्याची घटना दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सुई पोटात राहिल्याने ऑपरेशनचे टाके वाळत नसल्याने त्या महिलेला माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान रुग्णालयात दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) साबेराबी शेख चांदसाब या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी स्त्री रुग्णालय, वसमत येथे दाखल झाल्या होत्या, दिनांक २३/१२/२०१५ रोजी त्यांचेवर टाक्याची स्त्री नसबंदी कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आली.

- दिनांक २९/१२/२०१५ रोजी त्यांचे टाके काढण्यात आले. टाके काढल्यानंतर जखम पूर्ण भरून न आल्यामुळे उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी पुन्हा टाके घातले. ७ दिवस रुग्णालयात उपचारासाठी दखल राहण्याचा सल्ला दिला.
- दिनांक २/१/२०१६ रोजी सदर महिलेने कौंटूबिक अडचणीच्या कारणास्तव डॉक्टरांच्या सल्ल्याविरुध्द रुग्णालयातून सुटी घेतली. त्यानंतर त्यांनी सदर जखमेवर खाजगी डॉक्टरांकडून उपचार करवून घेतले.
- खाजगी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार जखम मालीश करत असतांना दिनांक २१/१/२०१६ रोजी त्यातून सुई निघाल्याचे सदर महिलेने जबाबात सांगितले. तथापि, पोटामध्ये सुई असल्याबाबत सोनोग्राफी,पोटाचा एक्सरे यासारखा वैद्यकीय पुरावा असल्याचे त्रिसदस्यीय चौकशी समितीने केलेल्या चौकशीत आढळून आले नाही.

(३) होय.

- सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी दिनांक १/२/२०१६ रोजी वैद्यकीय अधिक्षक स्त्री रुग्णालय वसमत यांनी केली आहे.
- जिल्हा शल्य चिकीत्सक हिंगोली यांनी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत दिनांक १/३/२०१६ रोजी चौकशी करण्यात आलेली आहे.

(४) सदरील दोन्ही चौकशी अहवालामध्ये वैद्यकीय अधिकारी अथवा कर्मचारी दोषी आढळून आल्याचे निदर्शनास आले नसल्याने, कार्यवाही करण्यात आलेली नाही.

- तथापि, भविष्यात कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर जंतुसंसर्ग होणार नाही यासाठी योग्य ती दक्षता घेण्याविषयी संस्था प्रमुख, शस्त्रक्रिया करणारे वैद्यकीय अधिकारी, परिचारीका यांना जिल्हा शल्य चिकित्सक हिंगोली यांचेकडून सक्त सुचना देण्यात आली आहे.
- कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजने अंतर्गत कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भिय प्रकरणासाठी जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन उपसमिती मार्फत खाजगी रुग्णालयात उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती देण्याविषयी कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्हा परिषदेमार्फत कॅन्सर, हृदयरोग व किडनी**
**रुग्णांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(८०) * १६२११ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेमार्फत कॅन्सर, हृदयरोग व किडनी अशा दुर्धर रोगाने पिडीत असलेल्या रुग्णांना आर्थिक मदत देण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १०० (३) मधील तरतुदीनुसार योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ करिता सदर योजनेकरिता जिल्हा परिषदेने रु.एक कोटी ची तरतूद मंजूर करुन प्रशासकिय मान्यता प्रदान केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना जिल्हापरिषदेचे आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असल्यामुळे या योजनेला तांत्रिक मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता परंतु शासनाकडून राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत दुर्धर आजारी रुग्णांना रु. १.५० लक्षपर्यंत मदत देण्यात येत असल्यामुळे सदर योजनेला तांत्रिक मान्यता देण्यात येत नसल्याचे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार सदर योजनेस त्वरित तांत्रिक मान्यता प्रदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित असल्याने जिल्हा परिषद योजनेस मान्यता देता येईल किंवा कसे, याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडे विचारविनिमय करुन निर्णय घेण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हापरिषद आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांना मधुमेह व सिकलसेल आजारावरील औषधसाठा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८१) * १५३१८ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राना ६७ प्रकारचे औषधी पुरविण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेकडे असूनही गेल्या आठ महिन्यांपासून मधुमेह व सिकलसेल या आजारावर औषधी साठा उपलब्ध नसल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राना मधुमेह व सिकलसेल या आजारावरील औषधीसाठा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) मधुमेह व सिकलसेल या आजारावरील औषधांची तातडीची गरज भागविण्यासाठी जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालये यांच्याकडील औषधसाठ्यामधून प्राथमिक आरोग्य केंद्रांना आवश्यकतेनुसार औषधांचा पुरवठा करण्यात येत आहे. तसेच रुग्ण कल्याण निधीमधून आवश्यकतेनुसार औषधांची खरेदी करुन रुग्णांना औषध पुरवठा करण्यात येत आहे.
(२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत उपलब्ध निधीमधून औषधी साहित्य खरेदी करण्याच्या प्रस्तावास आरोग्य सेवा संचालनालयाकडून दिनांक १५.०२.२०१६ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली असून त्यानुसार जिल्हा परिषद स्तरावरुन पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पश्चिम विदर्भातील व अकोला जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

**(८२) * १७२३८ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम विदर्भात सिंचनाचा २ लाख ४७ हजार हेक्टरचा अनुशेष कायम असताना आर्थिक वर्ष संपत आलेले असतानाही सिंचन प्रकल्पाच्या बांधकामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्याने पश्चिम विदर्भातील सिंचन प्रकल्पांची कामे रखडलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच अकोला जिल्ह्यात मागील वर्षी ३०० कोटी रुपयांहून अधिक निधी अखर्चित राहिला होता व यावर्षी प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने त्यात आणखी भर पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील इतर भागातील प्रकल्पांबाबत आढावा घेण्यात आला आहे, त्यात काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही. प्रकल्पांना अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत मंजूर प्रशासकीय मान्यता/सुधारीत प्रशासकीय मान्यता पेक्षा अधिक खर्च करण्याकरीता वेळोवेळी सक्षम स्तरावर मंजुरी देण्यात आल्यामुळे प्रकल्पांची कामे सुधारीत प्रशासकीय मान्यता अभावी रखडलेली नाहीत. तसेच जानेवारी, २०१५ ते फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत पश्चिम विदर्भातील २९ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देणेत आली आहे.

(२) सुधारीत प्रशासकीय मान्यते अभावी निधी अखर्चित राहिलेला नाही.

(३) व (४) शासनाच्या दिनांक ८/१०/२०१५ व दिनांक ६/११/२०१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात अखर्चित आर्थिक तरतुदींच्या मर्यादेत तसेच सन २०१५-२०१६ च्या वितरित केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत काही अटींचे अधीन, मंजूर प्रशासकीय/सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा वाढीव खर्चास मान्यता दिली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हा आरोग्य विभागातील भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(८३) * १७५४२ श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आरोग्य विभागातील भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चौकशी सुरु केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी तक्रार करणारे माजी उपाध्यक्ष श्री.राजेंद्र फाळके यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांचेकडील उपलब्ध कागदपत्रांचे पुरावे तसेच अन्य काही पुरावे ताब्यात घेऊन त्याचा उपयोग तपासकामी करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी व्यक्तींविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) श्री.राजेंद्र फाळके, सदस्य, जिल्हा परिषद यांनी आरोग्य विभागाच्या भरतीमध्ये गैरप्रकार झाला असल्याचा प्रश्न स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या बैठकीमध्ये उपस्थित केला होता. तथापि, त्यांनी कोणताही पुरावा सादर न केल्याने चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली नाही.

(३) व (४) सदर भरती ही जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली झालेली असून या भरती प्रक्रीयेमध्ये कोणताही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही अथवा तशी तक्रारही प्राप्त झालेली नाही.

-----------------

**राज्यात अवयवदानाकरिता जनजागृती करण्याबाबत**

**(८४) * १८४६९ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.पालघर) येथील ८० सदस्य असलेल्या कुटूंबातील सर्वांनी अवयवदान करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील शिक्षकाच्या अवयवदानामुळे चौघांना जीवनदान तर दोघींना दृष्टी दिल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, अवयवदानाच्या संदर्भात शासनाकडून परिणामकारकरित्या जनजागृती न केल्यामुळे अवयवदाते पुढे येण्याचे प्रमाण अत्यल्प आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी जनजागृती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत विभागीय प्रत्यारोपण समन्वय समितीकडील चौकशीमध्ये उपरोक्त बाबी खरे असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) व (५) राज्यामध्ये लाईव्ह अवयव प्रत्यारोपणापेक्षा कॅडेव्हर अवयव प्रत्यारोपणाचे प्रमाण कमी असल्याने त्यामध्ये वाढ व्हावी म्हणुन शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत. दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजी एकुण ४ (चार) शासन निर्णय निर्गमित केले असुन त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१) मस्तीष्कस्तंभ मृत्यू घोषित करणे व प्रमाणित करणे हे सर्व नोंदणीकृत रुग्णालयांना व राज्यातील इतर नॉन ट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर रुग्णालयांनाही बंधनकारक करण्यात आलेले आहे.

२) मस्तीष्कस्तंभ मृत्यू घोषित करण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असुन त्यानुसार सर्व रुग्णालयांनी कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

३) राज्यातील शस्त्रक्रिया गृह व अतिदक्षता विभागाची सुविधा असलेल्या सर्व रुग्णालयांना नॉन ट्रान्सप्लांट ऑगर्न रिट्रायव्हल सेंटर म्हणून नोंदणी करणे आवश्यक करण्यात आले आहे.

४) नोंदणीकृत प्रत्यारोपण केंद्राकडून प्रत्यारोपण कार्यक्रमात पारदर्शकता असणे व त्यांचे उत्तरदायित्व निश्चित करण्यात आले असून याबाबतच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

५) कु.जुही पवार या विद्यार्थीनीस महाराष्ट्र शासनातर्फे अवयवदान जनजागृतीसाठी ब्रँड अँबेसेडर म्हणुन घोषित केले आहे. तसेच उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य आरोग्य माहिती व शिक्षण कार्यालय, पुणे व सर्व विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंदे यांच्यामार्फत पथनाट्य, बॅनर्स, पोस्टर्स, जाहिराती, द रेडिओ जिंगल्स आणि चर्चासत्रांचे आयोजन करुन अवयवदानासंदर्भात समाजात जनजागृती करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथे जल आयुक्तालयाची निर्मिती करण्याबाबत**

**(८५) * १६०१४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८५१ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे जल आयुक्तालयाची निर्मिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयातील दुष्काळग्रस्त भागासाठी प्रस्तावित जल आयुक्तालयाची संरचना, कार्य व स्वरुप कशा पध्दतीचे असणार आहे,

(३) तसेच दुष्काळग्रस्त भागासाठी सक्षम जल आयुक्तालय प्रत्यक्ष केव्हा सुरु होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) जलसंधारण आयुक्तालयाची निर्मिती करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बदलापूर पूर्व (जि.ठाणे) येथे असलेल्या टावरीचा डोंगर ते चंदेरीचा किल्ला येथे वणवा लागल्याबाबत**

**(८६) * १७६३३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर पूर्व (जि.ठाणे) येथे असलेल्या टावरीचा डोंगर ते चंदेरीचा किल्ला येथे अज्ञान व्यक्तींकडून सायंकाळी अथवा रात्री वणवा लागत असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वणव्यात झाडे, वनसंपदा, पक्षी, प्राणी हे जळून नष्ट झाले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वणव्याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) चौकशी करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(५) संबंधित नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय रुग्णालयात झालेल्या दरवाढीबाबत**

**(८७) * १६१५८ श्री.विनायकराव मेटे, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंदराव पाटील, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व विशेषत: धुळे जिल्हा, उपजिल्हा रुग्णालयांसह ग्रामीण रुग्णालयांतील जवळपास २५० प्रकारच्या रुग्ण शुल्कात वाढ केली असल्यामुळे गरीब रुग्णांना उपचार घेणे अवघड झाल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शवविच्छेदनाकरिता मोफत असलेले आता २५००/- रु. मोठी शस्त्रक्रिया ६०/- रु. वरुन ५००/- रु., साधी शस्त्रक्रिया ६०/- रु. वरुन २००/- रु., सोनोग्राफी ३०/- रु. वरुन १००/- रु. अशा विविध रुग्णसेवेत भरमसाट वाढ केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढीव दर आणि खासगी रुग्णालयांमधून आकारले जाणारे दर यात खूप तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शुल्कवाढीमुळे अनेक गरीब रुग्ण शासकीय आरोग्य सेवेच्या लाभापासून वंचित राहतील, त्यामुळे शासकीय रुग्णालयात रुग्णाना नि:शुल्कपणे सेवा मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(५) असल्यास, सदर दरवाढ कोणत्या निकषांद्वारे करण्यात आली आहे,

(६) असल्यास, शहरी व ग्रामीण रुग्णालयातील सेवा दरवाढ करताना वेगळे निकष आहेत काय,

(७) असल्यास, सर्वसामान्य नागरिकांना पूर्वीच्या दरानुसार आरोग्य सेवा देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) शासन निर्णय दि. २८ डिसेंबर, २०१५ अन्वये रुग्ण शुल्कात काही प्रमाणात वाढ करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

गत १५ वर्षामध्ये रुग्णशुल्कात वाढ न केल्याने तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील रुग्णालये व या विभागाच्या अखत्यारीतील रुग्णालये यामध्ये रुग्णशुल्कात असणारी तफावत दुर करण्यासाठी सुधारीत दर लागू केले आहेत.

शवविच्छेदन हे मोफतच केले जाते. तथापि एम्बाल्मींग हे फक्त वैद्यकीय महाविद्यालयांत न्याय वैद्यक विभागामार्फत केले जाते, त्यासाठी रु. १५००/- ते ३५००/- इतके शुल्क शासन निर्णयात नमुद केले आहे.

(३) हे खरे नाही.

खाजगी रुग्णालयात आकारल्या जाणाऱ्या दरापेक्षा वाढीव दर खूप कमी आहेत.

(४) दारिद्रय रेषेखालील रुग्ण व जेष्ठ नागरीकांना सर्व आरोग्य सुविधा मोफत आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांना या दरवाढीतून वगळण्यात आले आहे.

(५) वैद्यकीय महाविद्यालय वा सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णालये यांतील दरांत समानता आणण्यासाठी दरवाढ करण्यात आली आहे.

(६) नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वन विभागाचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय नागपूरला स्थलांतरीत करण्याबाबत**

**(८८) * १६४२९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन विभागाचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय मनुष्यबळासह नागपूरला स्थलांतरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतल्याचे दि १ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचा पुनर्विचार करण्याबाबत नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार पुनर्विचार करुन सदर कार्यालय नाशिक येथेच ठेवण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:डब्ल्यूएलपी ०५.१५/प्र.क्र. १५०/फ-१, दिनांक ३०.१२.२०१५ अन्वये महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरणाचे कामकाज पार पाडण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक यांचे पदनाम सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण असे करण्यात आले आहे. सदर प्राधिकरणाचे मुख्यालय नागपूर येथे ठेवण्यात आलेले आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण स्थापन करण्याची आवश्यकता असल्याने प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून सदर प्राधिकरणाकडे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) ह्यांच्या सेवा वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

**पातळी (ता.पेठ, जि.नाशिक) येथील पाझर तलावांचे काम बंद पडल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत**

**(८९) * १८२३४ श्री.नागो गाणार :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातळी (ता.पेठ, जि.नाशिक) येथील पाझर तलावाचे काम अचानक बंद पडल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाचे काम त्वरीत करावे अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) पाझर तलावाच्या कामास वन विभागाने हरकत घेतल्याने सदर काम दिनांक १२/१२/१९८४ पासुन बंद आहे.

(२) नाही.

(३) व (४) या कामास रुपये ९,१७,८३४/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत प्रचलीत दरसूचीनुसार कामाची किंमत रुपये २,३१,१६,१६३/- एवढी असून या कामावर रु.९,३१,०००/- एवढा खर्च झाला आहे.

सदर कामाची किंमत शासनाच्या प्रचलीत मापदंडात तसेच योजनेच्या लाभव्यय गुणोत्तरात बसत नाही. यास्तव कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) नाशिक यांनी निर्लेखनाचा प्रस्ताव उपजिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे सादर केला आहे. सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.

-----------------

## वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील शासकीय व महापालिकेच्या रुग्णालयात अद्यावत सुविधा पुरविण्याबाबत

**(९०) * १५८२७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील १४ शासकिय रुग्णालये व दोन महापालिकेच्या रुग्णालयात अद्यावत सुविधा व डॉक्टरांचा अभाव असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांना महापालिका रुग्णालयात अद्यावत सुविधा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत सद्य:स्थितीत महानगर पालिकेची दोन रुग्णालये व एक शासकीय ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे.

महानगर पालिकेच्या रुग्णालयात विविध विभाग कार्यरत असून वैद्यकीय अधिकारी, स्त्रीरोगतज्ञ भिषक, बालरोगतज्ञ व इतर तज्ञ डॉक्टर्स वेळोवेळी उपलब्ध होतात. त्यामुळे नागरिकांना वेळेवर औषधोपचार मिळत आहेत. तसेच शासकीय रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना योग्य औषधोपचार व आरोग्य सुविधा पुरविल्या जात आहेत. गुंतागुंतीच्या प्रसुती माता व इतर अत्यावस्थेतील रुग्ण महानगरपालिका रुग्णालयात संदर्भित केले जातात. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते हे म्हणणे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किनवट (जि.नांदेड) येथील महामार्गावरील अवैध वृक्षतोडीबाबत

**(९१) * १५०७५ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) येथील महामार्गावर राज्य रस्ता क्र.२३० वरिल सावरगाव, माळकोल्हारी व इस्लापूर राज्य महामार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूची बाभळीची व इतर झाडे वन विभागाच्या अधिका-यांच्या संगनमताने तोडली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात असलेल्या दिंडोशी व येऊरच्या टेकड्या तोडण्याचे काम स्थगित करण्याबाबत

**(९२) * १६९११ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जर्नादन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.किरण पावसकर, श्री.शरद रणपिसे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (मुंबई) येथील नॅशनल पार्कच्या बफर झोनमध्ये असणारा २५ एकर हरित पटटा नष्ट करण्याच्या आणि गोरेगाव येथील दिंडोशी लगतचा डोंगर कापण्याच्या व येऊरच्या टेकड्या तोडण्याच्या प्रकाराची राष्ट्रीय हरित लवादाने गंभीर दखल घेऊन डोंगर कापणे, वृक्षराजाची नष्ट करणे आणि वनजमिनीचा वापर अन्य कामासाठी करुन देण्यास मनाई करावी अशा आदेश वन विभागाला दिल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिंडोशी व ठाण्याच्या येऊर परिसरातील टेकड्यांना महाविकास क्षेत्र जाहिर करण्यात यावे अशी येथील नागरीकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) राष्ट्रीय हरित लवादाने दिनांक १३.०१.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशात दिंडोशी सर्वे क्रमांक २३९ च्याबाबत परिसरात डोंगर उत्खनन, वृक्षतोड व वन जमीन वळतीकरणास मनाई करुन सदर क्षेत्राला संरक्षण देऊन "जैसे थे" परिस्थिती ठेवावी तसेच येऊर परिसरातील राखीव वनक्षेत्राचे वळतीकरणास मनाई करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मोफत असलेल्या शवविच्छेदनासाठी मूल्य आकारण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(९३) * १५५४५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपघात, आत्महत्या व इतर अनैसर्गिक मृत्यूनंतर शवविच्छेदन करणे कायदयाने बंधनकारक असून अशा अनैसर्गिक मृत्यूनंतर नातेवाईकांना मृतदेह हॉस्पिटलला जाईपर्यंत पोलीस व कोर्टातील व्यक्तिंना पैसे द्यावे लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोफत असलेल्या शवविच्छेदनासाठी आता शासन २००० रुपये आकारणार असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दारिद्रय रेषेखालील असलेल्या मृत व्यक्तींच्या शवविच्छेदनाबाबत शासनाने किती मूल्य आकारले आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पुनर्विचार करुन वाजवी दरात शवविच्छेदन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शवविच्छेदन हे मोफतच केले जाते. तथापि एम्बाल्मींग हे फक्त वैद्यकीय महाविद्यालयात न्याय वैद्यक विभागामार्फत केले जाते, त्यासाठी रु. १५००/- ते ३५००/- इतके शुल्क शासन निर्णयात नमूद केले आहे.

(३) दारिद्र रेषेखालील असलेल्या अथवा नसलेल्या मृत व्यक्तीच्या शवविच्छेदनासाठी मूल्य आकारले जात नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हा परिषदेत ३४ बंधाऱ्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(९४) * १७१५७ श्री.अमरिशभाई पटेल, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेत ३४ बंधाऱ्यांची कामे ८ वर्षापासून प्रगतीपथावर असताना देयके अदा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करावी असे आदेश जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांनी लघुपाटबंधारे पश्चिम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सिंचन गैरव्यवहाराचा अहवाल सादर झाला आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महागाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) अधरपूस प्रकल्पाची क्षमता वाढविणेबाबत**

**(९५) * १७३९६ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) वेणी अधरपूस प्रकल्पाची ९ हजार सिंचन क्षमता आहे परंतु सदर प्रकल्पाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने प्रकल्पात पुच्छपर्यंत पाणीसाठा होत नसल्याने सिंचन क्षमतेवर विपरित परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकल्पाची क्षमता वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

अधरपुस प्रकल्पाची खरीप-२५५१हे., रब्बी व दुहंगामी ५१९३ हे., उन्हाळी ५४६ हे. व बारमाही ८२० हे. अशी एकूण सिंचन क्षमता ९११० हे. आहे. सदर प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या शेवटच्या भागापर्यंत सिंचन कार्यक्रम राबविण्यात येत असून सन २०१२-२०१३ मध्ये या प्रकल्पावर ५५२६ हे. महत्तम सिंचन झालेले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सदर प्रकल्पाची ऱ्हास झालेली सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्याकरिता अधरपुस मध्यम प्रकल्प विशेष दुरुस्ती अंतर्गत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भांडणे, राधानगरी अभयारण्य (कोल्हापूर) येथे**
**भेकराची चोरटी शिकार झाल्याबाबत**

**(९६) * १५५०६ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडणे, राधानगरी अभयारण्य (कोल्हापूर) येथे भेकराची चोरटी शिकार केल्याप्रकरणी ९ जणांना अटक केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी अटक करण्यात आलेल्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) भांडणे, राधानगरी अभयारण्य (कोल्हापूर) येथे भेकराची चोरटी शिकार केल्याचे आढळून आले नाही तथापि दहा लोकांनी विना परवाना बंदूक व काडतुसांसह अभयारण्या क्षेत्रात अपप्रवेश करुन, विस्तव निर्माण केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे. हया प्रकरणी १० जणांना अटक करण्यात आली होती.

(२) अटक करण्यात आलेल्या आरोपींना मा. न्यायालयाने जामिनावर सोडले आहे. सदर आरोपींविरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी राधानगरी यांचे न्यायालयात फिर्याद दाखल करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोसम खोऱ्यासह-काटवन, सटाणा (ता.बागलाण, जि.नाशिक)**
**भागात होणारी अवैध वृक्षतोड**

**(९७) * १८३३६ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण मोसम खोऱ्यासह-काटवन, सटाणा (ता.बागलाण, जि.नाशिक) भागात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड केली जात असून लाकडाची तस्करी होत असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाचे या वृक्षतोडीकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही,

मोसम खोऱ्यासह काटवन, सटाणा भागात कोणत्याही प्रकारची अवैध वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलडाणा) येथे अतिरिक्त जिल्हा परिषद**
**बांधकाम विभाग सुरु करण्याबाबत**

**(९८) * १६६१२ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या विविध योजनेचा व्याप लक्षात घेता खामगाव येथे अतिरिक्त जिल्हा परिषद बांधकाम विभाग सुरु करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजीच्या पत्रानुसार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचा याबाबतचा प्रस्ताव पत्र क्र. ३१३८, दि. ७/०९/२०१४ शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे खामगाव येथे जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे स्वतंत्र विभाग खामगाव येथे सुरु करण्यात आल्यास घाटाखालील ६ तालुक्यातील प्रलंबित कामांना वेग मिळेल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) जिल्हा परिषदांकरिता उपलब्ध विभाग/उपविभाग, तांत्रिक मनुष्यबळ व कार्यभार विचारात घेऊन आवश्यक विभाग व उपविभाग निर्माण करण्याच्या जिल्हा परिषदांच्या प्रस्तावांचा आढावा घेऊन सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी सर्व जि.प.ना कळविण्यात आले आहे. तथापि, ३१ जिल्हा परिषदांकडून माहिती प्राप्त झालेली आहे. उर्वरित जिल्हा परिषदांकडून सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी पुन्हा कळविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने उर्वरित जिल्हा परिषदांकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नवीन विभाग/उपविभाग व आवश्यक कर्मचारीवृंद निर्माण करण्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय समिती समोर ठेवण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जलसंपदा विभागाच्या परवानगीने पाण्याचा वापर करणारे कारखाने करारनाम्याची कार्यवाही करत नसल्याबाबत

**(९९) * १६९५८ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपदा विभागाच्या परवानगीने अनेक उद्योग-व्यवसाय, कंपन्या, कारखाने पाण्याचा वापर करीत असताना केलेल्या करारनाम्याची कार्यवाही करीत नाहीत व परिणामी शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असतो ही बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

काही उद्योग व्यवसाय, कंपन्या, कारखाने पाण्याचा वापर करीत असताना करारनामा करत नाहीत तसेच करारनामा केला असल्यास त्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करीत नाहीत. अशा संस्थांवर प्रचलित शासन नियमानुसार दंडात्मक दराची आकारणी करण्यात येते. त्यामुळे शासनाचा महसूल बुडतो हे खरे नाही.

(२) व (३) करारनाम्यानुसार कार्यवाही करीत नसलेल्या संस्थांवर दंडात्मक आकारणी करुन पाणी वसुलीची कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयात मानव विकासासाठी प्राप्त निधी जानेवारी अखेरपर्यंत खर्च झाल्याबाबत

**(१००) * १७२०२ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात मानव विकासासाठी ७.९५ कोटी रुपयांचा प्राप्त निधी जानेवारी अखेरपर्यंत खर्च झाल्याने उर्वरित २.५ कोटीचा निधीची प्रतिक्षा संबंधित यंत्रणेला लागली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही, मानव विकास कार्यक्रमांतर्गत नाशिक जिल्ह्यास फेब्रुवारी, २०१६ अखेर वितरीत रु. ७५६.९६ लक्ष निधीपैकी विविध यंत्रणांचा खर्च रु. ५८२.१६ लक्ष झाला आहे. परिणामी उर्वरित निधीची प्रतिक्षा यंत्रणांना लागली असल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शहादा (जि.धुळे) तालुक्यातील तापी नदीवरील सारंगखेडा व प्रकाशा बॅरेजचे पाणी गुजरात सरकार वापरत असल्याबाबत**

**(१०१) * १७३५९ श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहादा (जि.धुळे) तालुक्यातील तापी नदीवरील सारंगखेडा व प्रकाशा बॅरेजसचे पाणी अडवले जाते ते पाणी महाराष्ट्र राज्याच्या वाटयाचे असून गुजरात सरकार वापरत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने राज्यातील शेतकऱ्यांचा विचार करुन गुजरात सरकार विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याच्या अर्थव्यवस्थेबाबत मुंबईत तीन दिवसीय चिंतन बैठक झाल्याबाबत**

**(१०२) * १७८७१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या अर्थव्यवस्थेबाबत शासनाने माहे डिसेंबर, २०१५ व माहे जानेवारी, २०१६ मध्ये तीन दिवसीय चिंतन बैठक मुंबईत घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणत्या विषयावर चर्चा झाली व कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.